1. कलम ३७० निर्मिती व प्रवास, "Research Journey", International Multidisciplinary E Research Journal, Peer Refereed and Index Journal February 2020, Special Issue-231, Impact Factor 6.625,ISSN - 2348-7143.

2. महाराष्ट्राच्या राजकारणात मराठा जातीची भूमिका, "AJANTA" Peer Reviewed Refereed and UGC listed Journal No. 40776, Volume XI, Issue- II, April- June 2022, Impact Factor 6.306, ISSN-2277-5730.

3. मराठा पाटीदार समाजाच्या आंदोलनाची प्रस्तुतता, Current Global Reviewer UGC Approved International Research Refereed Journal for All Subjects and All languages, Special Issue - 21 April 2018, Impact Factor - 2.143, UGC Approved Sr.No. 64310, ISSN- 2319-8684.

4. यशवंतराव चव्हाण यांचे धुरीणत्वाचे राजकारण एक चिकित्सक परीक्षण, Social Existence, An International Registered and Recognised Research Journal Related to Social Sciences, Aug.- Oct. 2014, volume-II, issue-I, ISSN- 2321-6069.

5. संघर्ष भटक्या विमुक्त जमातीच्या अस्तित्वाचा, Social Existence, An International Registered and Recognised Research Journal Related to Social Sciences, Nov.- Jan. 2014, volume-III, issue-I, ISSN- 2321-6069.

6. इतर मागास जातीचे राजकारण, AKSHARDEEP,International Monthly Research Journal for All Subjects, Vol.II, Issue-V, November 2013, ISSN- 2278-8204.

7. कथा मराठा मूक मोर्चाच्या उद्याची, समाजप्रबोधनपत्रिका, जुलै-सप्टेंबर २०१७.

8. महिला सक्षमीकरणाची आनंदगाथा, महाराष्ट्र वार्षिकी 2022, द युनिक अकॅडमी पब्लिकेशन, ISSN - 789392.

Impact Factor – 6.625

ISSN – 2348-7143

INTERNATIONAL RESEARCH FELLOWS ASSOCIATION'S

# RESEARCH JOURNEY

International Multidisciplinary E-Research Journal

PEER REFREED & INDEXED JOURNAL

February - 2020 Special Issue – 231

## INDIAN CONSTITUTION'S ARTICLE 370, 35 A JAMMU & KASHMIR



**Guest Editor**
Dr. Somprasad Kenjale
Principal,
M. S. Kakade College, Someshwarnagar
Tal- Baramati, Dist- Pune [M.S.] India

**Chief Editor**
Dr. Dhanraj T. Dhangar (Yeola)

Executive Editor : Dr. Nilesh Adhav
Associate Editors : Prof. Narayan Rajurwar
: Dr. Jaya Kadam
: Dr. Devidas Waydande
: Dr. Pravin Tate-Deshmikh
: Dr. Sanju Jadhav

This Journal is indexed in :
- Scientific Journal Impact Factor (SJIF)
- Cosmos Impact Factor (CIF)
- Global Impact Factor (GIF)
- International Impact Factor Services (IIFS)

For Details Visit To : www.researchjourney.net

SWATIDHAN PUBLICATIONS

INTERNATIONAL RESEARCH FELLOWS ASSOCIATION

Impact Factor – 6.625 ISSN – 2348-7143

INTERNATIONAL RESEARCH FELLOWS ASSOCIATION'S

# RESEARCH JOURNEY

International Multidisciplinary E-Research Journal

PEER REFREED & INDEXED JOURNAL

February -2020 Special Issue – 331

## INDIAN CONSTITUTION'S ARTICLE 370, 35 A & JAMMU & KASHMIR

**Guest Editor**
Dr. Somprasad Kenjale
Principal,
M. S. Kakade College, Someshwarnagar
Tal- Baramati, Dist- Pune [M.S.] India.

**Executive Editor**
Dr. Nilesh Adhav

**Associate Editors**
Prof. Narayan Rajurwar
Dr. Jaya Kadam
Dr. Devidas Waydande
Dr. Pravin Tate-Deshmikh
Dr. Sanju Jadhav

**Chief Editor**
Dr. Dhanraj T. Dhangar (Yeola)

SWATIDHAN INTERNATIONAL PUBLICATIONS
For Details Visit To : www.researchjourney.net

© All rights reserved with the authors & publisher Price : Rs. 1000/-

ISSN : 2348-71
February


| | | | |
|---|---|---|---|
| 32 | कलम ३७० ची ऐतिहासिक पार्श्वभूमी | प्रा. महेश कुलकर्णी | 133 |
| 33 | कलम ३७० रद्द झाल्यानंतर जम्मू काश्मिरातील परिस्थिती | डॉ. मेघराज औटी, प्रा. महेश कुलकर्णी | 135 |
| 34 | काश्मीर वासियांच्या मनात आशेचा दिवा - कलम ३७० रद्द | प्रा. सौ. मृणालिनी मोहिते | 137 |
| 35 | ऐतिहासिक पार्श्वभूमी जम्मू काश्मीर कलम ३७०,३५ अ | प्रा. पोपट झोंबाडे | 139 |
| 36 | कलम ३७० समज गैरसमज एक समाजशास्त्रीय विश्लेषण | प्रा. राजकुमार गांधले | 142 |
| 37 | कलम ३७० आणि जम्मू काश्मीरचा इतिहास | प्रा. रामदास येडे | 146 |
| 37 | कलम ३७० रद्द केल्याचा भारत – पाक संवंधावरील परिणाम | प्रा. सचिन घायतडके | 149 |
| 38 | कलम ३७० व कलम ३५ 'अ' जम्मू काश्मीर राज्यघटना आदेश १९५४ | प्रा. लक्ष्मण साके | 152 |
| 39 | काश्मीर समस्या आणि भारतीय संविधानातील कलम ३७० : एक दृष्टीक्षेप | डॉ. प्रदीप पाटील | 155 |
| 40 | जम्मू काश्मीर आणि कलम ३७० | प्रा. सुनिल नेवकर | 161 |
| 41 | कलम ३७० निर्मिती व प्रवास | प्रा. नामदेव पवार | 169 |
| 42 | डॉ.बाबासाहेब आंबेडकर,भारतीय संविधान आणि कलम ३७० | श्री. आदिनाथ लोंढे | 173 |
| 43 | राज्यघटनेतील कलम ३७० रद्दबादल संविधानिक की असंविधानिक | कैलास शिंदे | 176 |
| 44 | कलम ३७० – काश्मीरला विशेष तरतूद देणार कलम | प्रा. दुर्गा भिसे, डॉ. अरविंद तेलंग | 179 |
| 45 | कलम ३७० रद्द करून भरीव विकासाच्या दृष्टीने एक पाऊल | श्री. अमोल लकडे | 185 |
| 46 | Indian Diplomacy and Article 370 | Dr. Sanjyot Apte | 188 |
| 47 | Article 370 and Kashmir : Some Reflections | Dr. Harish Navale | 191 |
| 48 | A Geographical Study on Tourism in Jammu and Kashmir Valley | Prof. Jawahar Chaudhari | 194 |
| 49 | The Land and The People of Kashmir : A Historical Review | Dr. Devidas Waydande | 198 |
| 50 | 'Article 370 : Will Abrogation Bring Development and Peace to J&K?' | Mr. Gunratna Sontakke | 202 |
| 51 | Article 370 of The Indian Constitution | Dr. Prakash Rodiya | 208 |
| 52 | Jammu & Kashmir & The Politics of Article 370 : Historical Revive | Dr. Abhijit Patil | 211 |


*Our Editors have reviewed papers with experts' committee, and they have checked the papers their level best to stop furtive literature. Except it, the respective authors of the papers are responsible for originality of the papers and intensive thoughts in the papers. Nobody can republish these papers without pre-permission of the publisher.*

***- Chief & Executive Edi***

**Published by –**
© Mrs. Swati Dhanraj Sonawane, Director, Swatidhan International Publication, Yeola, Nashik
Email : swatidhanrajs@gmail.com Website : www.researchjourney.net Mobile : 9665398258

'RESEARCH JOURNEY' International Multidisciplinary E- Research Journal
Impact Factor - (SJIF) – 6.625,
Special Issue 231 : Indian Constitution's Article 370, 35 A & J&K.
Peer Reviewed Journal
ISSN : 2348-7143
February-2020

# कलम ३७० निर्मिती व प्रवास

प्रा. नामदेव अशोक पवार
राज्यशास्त्र विभाग
कला, विज्ञान आणि वाणिज्य महाविद्यालय,
इंदापूर, जि. पुणे
मो. नं. ९४०४१७०९६९
ई–मेल–namdevpawar11@gmail.com

भारताला स्वातत्र्य मिळून सात दशके पूर्ण झाली स्वातंत्र्य मिळाल्यापासून आजपर्यंत आपण अनेक समस्यांशी झगडत आहोत. त्यातील प्रमुख समस्या म्हणजे काश्मीर आणि कलम ३७० ही होय. एकंदरीत भारताच्या घटनात्मक आणि राजकीय प्रक्रियेला दीर्घकाळ प्रभावीत करणारे सर्वात वादग्रस्त व चर्चेचा विषय ठरलेले कलम म्हणजे ३७० होय. कलम ३७० हे कश्मीरच्या वेगळेपणाचे (कश्मिरीयतचे) एक प्रतिक मानले गेले, त्यामुळे ते अधिकच अडचणीचे ठरले. सर्वसाधारणपणे ३७० कलमाबाबत दोन टोकाचे दृष्टीकोन पहायला मिळतात. एक म्हणजे कलम ३७० रद्द केलेच जाऊ शकत नाही अशी भावना व समज आणि दुसरे म्हणजे कलम ३७० रद्द करणे हाच काश्मीर समस्येवरील एकमेव रामबाण उपाय आहे. मात्र ३७० कलम हा मुद्दा वाटतो त्यापेक्षा अधिक राजकीय व भावनिक आहे. तो तसा भावनिक व राजकीय का झाला हे समजून घ्यायचे असेल तर कलम ३७० ची निर्मीती कशी झाली? कलम ३७० कोणत्या तरतुदीमुळे विशेष ठरते? कलम ३७०चा प्रवास? कलम ३७० रद्द करण्यामुळे काय बदल होणार? कलम ३७० रद्द केल्यानंतरचे धोके काय? इ. प्रश्न समजून घेणे गरजेचे आहे. प्रस्तूत संशोधन लेखामध्ये या प्रश्नांचा शोध घेण्याच्या दृष्टीने प्रयत्न करण्यात आलेला आहे.

## कलम ३७० ची निर्मीती

घटना समितीचे एक सदस्य एन.गोपालस्वामी अय्यंगर यांनी १७ ऑक्टोबर १९४९ रोजी घटनासमिती मध्ये ३०६ (अ) (आत्ताचे कलम ३७०) सादर केले या कलमावर फारशी चर्चा न होता त्याच दिवशी ते मान्यही करण्यात आले. या कलमानुसार जम्मू – काश्मीर राज्याला इतर संस्थानापेक्षा वेगळी वागणूक देण्याचे कारण अय्यंगर यांनी स्पष्ट केले ते पुढीलप्रमाणे.

१) काश्मीर राज्यातील सांस्कृतीक –सामाजिक परिस्थिती भिन्न आहे त्यामुळे ती तात्काळ भारताशी एकात्म होण्यासारखी नाही. कालांतराने असे एकात्मीकरण होईल.

२) काश्मीरमध्ये सध्या अंतर्गत अशांतता आहे तसेच हा प्रश्न संयुक्त राष्ट्राकडे आहे. त्यावर लागलीच तोडगा निघण्याची चिन्हे नाहीत.

३) काश्मीरमध्ये शांतता प्रस्थापित झाल्यानंतर तेथे सार्वमत घेऊन लोकेच्छेचा आदर करण्यास भारताने बांधिलकी मानली आहे.

## कलम ३७० मधील तरतुदी

भारतीय संविधानाच्या पहिल्याच कलमात काश्मीरला भारताचे १५ वे राज्य म्हणण्यात आले. परंतु त्याची तत्कालीन पार्श्वभूमी लक्षात घेऊन संविधानात कलम ३७० चा अंतर्भाव करण्यात आला होता. ज्यात तात्पुरती, संक्रमणात्मक व विशेष प्रावधाने अंतर्भूत होती यात.

१) जम्मू–काश्मीर राज्यासाठी स्वतंत्र राज्यघटना व स्वतंत्र ध्वज

२) जम्मू–काश्मीर संदर्भात कोणताही नवा कायदा करण्यासाठी केंद्र सरकारला त्या राज्याच्या विधानसभेची संमती घ्यावी लागते.

३) काश्मीर बाहेरील देशातील कोणताही व्यक्ती जमीन, संपत्ती इ. मध्ये गुंतवणूक करू शकणार नाही.

४) सरकारी इमारतीवर काश्मीरचा झेंडा

५) काश्मीर राज्यासंदर्भात कायदे करण्याचा अधिकार केंद्रिय कायदेमंडळाला केवळ सुरक्षा, आंतरराष्ट्रीय संबंध आणि दळणवळण व दुरसंचार याच क्षेत्रात देण्यात आला.

या सर्व तरतुदीमुळे जम्मू–काश्मीर राज्याला विशष दर्जा प्राप्त झालेला होता.

## कलम ३७० चा प्रवास

पाकिस्तानचे काश्मीरवरील अतिक्रमण थोपविण्याकरीता भारताच्या सहकार्याच्या अपेक्षेमुळे २७ ऑक्टोंबर १९४७ रोजी काश्मीरचे महाराज राजा हरिसिंग यांनी सामीलनाम्यावर सही केली. कालांतराने काश्मीरमध्ये शांतता निर्माण झाल्यावर काश्मीर भारतात विलीन होईल ही संबंध भारतीय लोकांची अपेक्षा होती. दुसरीकडे काश्मीरी जनतेला ना पाकिस्तानामध्ये समाविष्ठ व्हायचे होते ना वेगळे व्हायचे होते. त्यांना ३७० वे कलम हे त्यांचे वेगळेपण (कश्मिरीयत) टिकवण्याची भारतीयांनी दिलेली ग्वाही वाटत होती. मात्र काश्मीरी जनता भारनात मिसळून जाईल ही भारतीयांची अपेक्षा व आपले वेगळेपण जपण्याची काश्मीरींची ओढ यामधील विसंगती हेच काश्मीर समस्येचे खरे मूळ आहे.

कलम ३७० हे काश्मीर राज्याला विशेष दर्जा देणारे आहे तर १९५४ साली राष्ट्रपतीच्या आदेशानंतर कलम '३५(अ)' हे भारतीय संविधानात जोडले गेले. यानुसार जम्मू–काश्मीर मधील विधानसभेला राज्यातील नागरीकांच्या नागरीकत्वाची व्याख्या ठरवण्याचा विशेष अधिकार दिला गेला. कलम ३७० बाबत वेगवेगळया राजकीय पक्षाची भूमीका वेगवेगळी पहायला मिळते. कॉंगेस व डाव्या पक्षाची भूमिका अशी आहे की, कलम ३७०ही तात्पुरती सोय आहे. काश्मीरमधील लोकांची मने वळवून त्यांना अन्य देशवासियांशी जोडता येईल. तसेच काश्मीरमधील सर्व प्रादेशिक पक्ष काश्मीर व कलम ३७० चे वेगळेपण जपण्यासाठी आग्रही दिसतात. तर याउलट एका देशात दोन कायदे, दोन पंतप्रधान, दोन झेंडे आशी तात्पुरती रचना करण्यास देखील राष्ट्रीय स्वयंसेवक संघ, हिंदू महासभा व अन्य कांही संघटनाचा विरोध होता. यासाठीच डॉ. श्यामप्रसाद मुखर्जी हे पंडीत नेहरूंच्या सरकारमधून बाहेर पडले. त्यातच त्यांना होतात्म्य पत्करावे लागले.

राष्ट्रीय स्वयंसेवक संघाने प्रथमतः १९५३ साली अखिल भारतीय कार्यकारिणी मंडळाच्या बैठकीत कलम ३७० बाबत चिंता मांडली होती १९६४ च्या प्रतिनिधीसभेत कलम रद्द करण्याबाबत प्रथमच आक्रमक भूमीका घेतली. आणि जम्मू काश्मीरचे विशेषत्व रद्द करून इतर राज्याच्या पातळीवर आणण्याची मागणी केली गेली. पुढे जनसंघाने आणि आताच्या भाजपने आपल्या पक्ष जाहीरनाम्यातच कलम ३७० रद्द करण्याचे आश्वासन दिलेले पहायला मिळते.

## कलम ३७० रद्द करण्याचा निर्णय

दुसऱ्यांदा केंद्रात सत्तेत आल्यानंतर मोदी सरकारने अवघ्या ६६ दिवसात आपल्या जाहीरनाम्यात सातत्याने कलम ३७० रद्द करण्याचे दिलेले आश्वासन पूर्ण केले. राज्यसभेत हे विधेयक १२५ विरूध्द ६१ मतानी आणि लोकसभेत ३७० विरूध्द ७२ मतांनी हे कलम ३७० रद्द करण्याचे विधेयक पारीत केले. ३७० कलम रद्द, जम्मू काश्मीरची स्वतंत्र घटना रद्द आणि जम्मू काश्मीरचे विभाजन असा तिहेरी घाव घातला.

ISSN : 2348-7143
February-2020

भाजप सरकारच्या कलम ३७० रद्द करण्याला आम आदमी पक्ष, तेलगू देसम पक्ष, एआयडीएमके, वाय एस आर कॉंग्रेस, बिजू जनता दल, अकाली दल, लोकजनशक्ती पार्टी, आरपीआय, शिवसेना इं. पक्षांनी पाठींबा दिला. तर कॉंग्रेस, पीडीपी, नॅशनल कॉन्फरन्स, समाजवादी पक्ष, आरजेडी, डीएमके, जेडीयु, मुस्लिम लीग, सीपीआय, सीपीआयएम इ. राजकीय पक्षांनी विरोध दर्शवला.

भाजप सरकारने ३७० रद्द करण्याचा निर्णय ज्या पध्दतीने घेतला त्यावर टीका केली जात आहे. उदा. पाळलेली गुप्तता, खोऱ्यामध्ये लागू केलेली संचारबंदी, अमरनाथ यात्रा रद्द करणे, इंटरनेट सेवा खंडीत करणे, राज्याबाहेरील विद्यार्थ्यांना तसेच पर्यटकांना बाहेर नेणे इ. मुद्यांवर सरकारवर टीका होत आहे. आणखी एक होणारी टीका म्हणजे भारतीय संसद काश्मीर संदर्भात कायदा करू शकत नाही. काश्मीर संदर्भात काश्मीरची विधानसभाच कायदा करू शकते विशीष्ट परिस्थिती निर्माण झाली तरच राष्ट्रपती आदेश काढू शकतात.

जम्मू काश्मीरमध्ये विधानसभा अस्तित्वात नसणे व राष्ट्रपती राजवट लागू असणे हीच ती पोषक परिस्थिती भाजप सरकारने निर्माण केली महेबूबा मूफ्ती व ओमर अब्दुला यांनी जर तडजोड करून विधानसभेत बहुमत दाखवले असते तरी काश्मीरमध्ये राष्ट्रपती राजवट लावता आली नसती. ही परिस्थिती लक्षात न घेता विरोधकांनी एकच मुद्दा लावून धरला आहे की, विधानसभेची संमती घेतल्याशिवाय विभाजन होऊ शकत नाही. पण ती संमती राष्ट्रपती राजवट असताना त्यांच्या एका आदेशाने मिळू शकते ही घटनात्मक तरतूद असण्याकडे कोणाचे लक्ष नव्हते. किंबहुना त्यासाठीच महेबुबांच्या सोबत सरकार स्थापन करून तीन वर्ष चालवले व एके दिवशी महेबुबा यांच्या पक्षांशी असलेली आघाडी तोडून सर्व अधिकार राष्ट्रपतीच्या हाती येतील अशी मज्जता करून ३७० कलम रद्द केले.

कलम ३७० रद्द केल्यामुळे होणारे बदल

कलम ३७० रद्द होण्याने राजकीय व घटनात्मक स्वरूपाचे पुढील बदल होतील.

१) एकच पंतप्रधान, एकच राज्यघटना व एकच ध्वज राहील.
२) सर्व सरकारी इमारतीवर भारताचा ध्वज फडकेल.
३) एक देश व एकच कायदा असेल.
४) जम्मू काश्मीर संदर्भात कोणताही नवा कायदा निर्माण करण्यासाठी केंद्र सरकारला त्या राज्याच्या विधानसभेच्या संमतीची गरज लागणार नाही.
५) काश्मीर बाहेरील देशातील व्यक्ती काश्मीरमध्ये संपत्ती व जमीनीमध्ये गुंतवणुक करू शकेल.
६) काश्मीरमधील अनुसुचीत जाती. अनुसुचीत जमाती व गरीब सवर्णाना शिक्षण व नोकरीमध्ये आरक्षण प्राप्त होईल.
७) अल्पसंख्यांकांना अधिकार मिळतील.
८) जम्मू काश्मीरमधील विधानसभेचा कार्यकाल ५ वर्षे होईल.
९) काश्मीरात कलम ३६० अन्वये केंद्र सरकार आर्थिक आणीबाणी लागू करेल.
१०) काश्मीरला भारतीय कायदे लागू झाल्यामुळे उद्योजक गुंतवणुकीसाठी येथे वळतील, वाढते उद्योगधंदे, उत्तम शैक्षणिक संस्था, दळणवळणाच्या सोयी, पर्यटनाच्या संधी आणि सुधारीत अर्थव्यवस्था यांच्या जोरावर काश्मीर प्रांताचाही विकास होईल.
११) जम्मू –काश्मीर दिल्लीच्या थेट अधिपत्याखाली आल्यामुळे तथील सुरक्षेचा जटील प्रश्न सोडवणे केंद्राला सुकर होईल.

कलम ३७० रद्द केल्यानंतरचे संभाव्य धोके

भाजप दुसऱ्यांदा स्पष्ट बहुमतात सत्तेत आल्यानंतर कलम ३७० रद्द करेल हे अपेक्षितच होते. त्यामुळे भाजप सरकारने फसवणूक केली असे म्हणता येणार नाही. फार तर एवढा मोठा निर्णय घेताना सरकारने सर्व राजकीय पक्षांना विचारात व विश्वासात घ्यायला हवे असे म्हणता येईल. कलम ३७० हटवून भारतनाने पाकिस्तानला अडचणीत आणले आहे. कारण ज्या कलमाचा आधार प्रतिकात्मक स्वरूपात का असेना काश्मीरच्या लढयासाठी घेतला जात होता. तो आधारच आता गळून पडणार आहे. काश्मीरचे ते वेगळेपणच गेले तर पाकिस्तानच्या वैचारिक पातळीवरील लढयाचा एक महत्वाचा पायाच निघून जातो.

कलम ३७० मधील केलेल्या बदलाविरूध्द आंतरराष्ट्रीय पातळीवर पाकिस्तानच्या प्रयत्नांना यश आले नाही. आता छुप्या पध्दतीने पाकिस्तान देशांतर्गत पातळीवर वेगवेगळया काश्मिरी गटांना या संदर्भात लढा देण्यास मदत करेल. हा लढा एका पातळीवर दहशतवादी लढयाचे स्वरूप घेईल. तर दुसऱ्या पातळीवर भारताच्या निर्णयाच्या विरोधात कायदेशीर लढा देणाऱ्या गटांना आणि राजकीय पक्षांना पाठींबा देईल. त्यामुळे पाकिस्तानचा काश्मीर बाबताचा लढा ३७० कलमावर थांबणार नाही. त्यादृष्टीने तो एक प्रदीर्घ लढा आहे.

काश्मीरमधील लोकाची मानसिकता बदलत नाही तोपर्यंत त्याचा फायदा पाकिस्तान घेत राहील हा धोका कायम राहील. आता या आव्हानाला तोंड देण्यासाठी सर्वसमावेशक प्रयत्न करावे लागतील. काश्मीरी जनतेशी सवांदाची प्रक्रिया अविरतपणे चालू ठेवून त्यांची मानसिकता बदलावी लागेल. काश्मीरमध्ये शैक्षणिक, औद्योगिक व पर्यटनाचा विकास करावा लागेल रोजगारांच्या संधी वाढवत नेऊन नेथील तरूणाच्या हाताला काम दिले तर तरूणाची मानसिकता बदलण्यास मदत होईल. या सर्व गोष्टी येणाऱ्या काळात सरकार कसे पाऊले उचलेल यावरच उवलंबून आहेत.

संदर्भ:—

१. Basu D.D.,2005, Introduction to the constitution of India, Nagpur, Wadhwa and
२. co.
३. Laxmikant M. 2008, Indian Polity, New Delhi, Tata mc Graw Hill Publishing .
४. फडके य. दि., २००१, जम्मू– काश्मीर : स्वायत्तता की स्वातंत्र्य ?
५. जाधव तुकाराम, महेश शिरापुरकर, २०११, भारतीय राज्यघटना व घटनात्मक प्रक्रिया खंड –१,
६. पुणे, द. युनिक अकॅडमी.
७. दै. लोकमत : दि. ६ ऑगस्ट २०१९ ; ७ ऑगस्ट २०१९.
८. दै. लोकसत्ता : दि. ६ ऑगस्ट २०१९ ; ७ ऑगस्ट २०१९.
९. दै. पुढारी : दि. ६ ऑगस्ट २०१९ ; ७ ऑगस्ट २०१९; १४ ऑगस्ट २०१९.
१०. दै. सकाळ : दि. ६ ऑगस्ट २०१९ ; ७ ऑगस्ट २०१९; १५ ऑगस्ट २०१९.
११. दै. महाराष्ट्र टाईम्स, दि. ०७ ऑगस्ट २०१९.

Peer Reviewed Refereed
and UGC Listed
Journal No. 40776

ISSN 2277 - 5730
AN INTERNATIONAL MULTIDISCIPLINARY
QUARTERLY RESEARCH JOURNAL

# AJANTA

Volume - XI, Issue - II,
April - June - 2022
Marathi Part - III / Hindi





Impact Factor /
Indexing
2020 - 6.306
www.sjifactor.com

Ajanta
Prakashan

ISSN 2277 - 5730
AN INTERNATIONAL MULTIDISCIPLINARY
QUARTERLY RESEARCH JOURNAL

# AJANTA

Volume - XI Issue - II April - June - 2022

MARATHI PART - III / HINDI

Peer Reviewed Refereed
and UGC Listed Journal

Journal No. 40776

ज्ञान-विज्ञान विमुक्तये

IMPACT FACTOR / INDEXING
2020 - 6.306
www.sjifactor.com

❖ EDITOR ❖
Asst. Prof. Vinay Shankarrao Hatole
M.Sc (Maths), M.B.A. (Mktg.), M.B.A. (H.R.),
M.Drama (Acting), M.Drama (Prod. & Dir.), M.Ed.

❖ PUBLISHED BY ❖

Ajanta Prakashan
Aurangabad. (M.S.)

# CONTENTS OF MARATHI PART - III


| अ.क्र. | लेख आणि लेखकाचे नाव | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| ११ | भारतीय लोकशाही व कल्याणकारी राज्य<br>**प्रा. डॉ. अरूण महादेव राख** | ५३-५५ |
| १२ | महाराष्ट्र आणि प्रादेशिक असमतोल<br>**गायकवाड निशा मच्छिंद्र** | ५६-६२ |
| १३ | साठोत्तरी ग्रामीण कादंबरी : शेतकऱ्यांच्या समस्यांचे चित्रण<br>**डॉ. रमेश श्रीरंग औताडे** | ६३-६५ |
| १४ | महाराष्ट्रातील आदिवासी समाजाच्या विकासात एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्पाची भूमिका<br>**प्रो. डॉ. डी. सी. वाबळे**<br>**प्रा. डी. वाय. रणदिवे** | ६६-७३ |
| १५ | भारतीय लोकशाही व आघाडीचे राजकारण<br>**डॉ. सुनील पिंपळे** | ७४-७६ |
| १६ | भारतीय संविधानातील मार्गदर्शक तत्वांची अंमलबजावणी : एक अभ्यास<br>**श्री. लक्ष्मण शेषराव गोरे**<br>**श्री. मोईन तडवी** | ७७-८१ |
| १७ | महाराष्ट्राच्या राजकारणात मराठा जातीची भूमिका<br>**नामदेव अशोक पवार**<br>**प्रो. डॉ. दत्तात्रय वाबळे** | ८२-९३ |
| १८ | जागतिक दहशतवाद : उदय आणि विकास<br>**प्रा. डॉ. राजू भागाजी वनारसे** | ९४-१०३ |
| १९ | स्त्रिया, जमीन मालकी हक्क व सामाजिक आव्हाने<br>**श्रीकृष्ण परिहार**<br>**डॉ. रावसाहेब बारोटे** | १०४-१०६ |
| २० | भौगोलिक माहिती तंत्रप्रणालीचा एक तात्विक अभ्यास<br>**निशा रामदास शिंदे**<br>**प्रा. डॉ. छत्रगुण भोरे** | १०७-१११ |
| २१ | भारतीय संघराज्यवाद : सहकार्य आणि संघर्ष<br>**मिर्झा मोसीनबेग गुलजारबेग** | ११२-११७ |

# १७. महाराष्ट्राच्या राजकारणात मराठा जातीची भूमिका

**नामदेव अशोक पवार**
संशोधक विद्यार्थी, राज्यशास्त्र विभाग, हिंद सेवा मंडळाचे पेमराज सारडा महाविद्यालय, अहमदनगर.
**प्रो. डॉ. दत्तात्रय वाबळे**
साहेबराव शंकरराव ढमढेरे कला व वाणिज्य महाविद्यालय, तळेगाव, पुणे.

## प्रस्तावना

भारताच्या लोकशाही राजकीय प्रक्रियेवर अनेक घटकांचा प्रभाव सातत्याने पडत असतो त्यामध्ये धर्म, भाषा, जात, पंथ आणि वर्ग इत्यादींचा समावेश होतो. देशाच्या आणि राज्याच्या राजकारणात जातींची भूमिका महत्वपूर्ण राहिलेली आहे. समकालीन सामाजिक शास्त्रांच्या चर्चाविश्वामध्ये जात व राजकारण यांच्या अभ्यासासंदर्भात 'जाती संघटना' (Caste Organization) आणि जातीचा आग्रही आविष्कार (Caste Assertion) यांचे अभ्यास मध्यवर्ती आहेत. प्रस्तुत संशोधनपर लेखांमध्ये महाराष्ट्रातील मराठा जातीच्या बदलत्या राजकीय पार्श्वभूमीवर मराठा सेवा संघाचा उदय कसा झाला याचा शोध घेण्याचा प्रयत्न केलेला आहे.

महाराष्ट्राच्या राजकारणात मराठा ही जात केंद्रभागी होती तसेच सुरुवातीच्या टप्प्यात मराठा जातीच्या नेतृत्वाने सर्वसमावेशक राजकारण करत मराठा जातीच्या राजकारणाला सर्वजातीय संमती मिळवली होती. परंतु १९८० नंतर मराठा जातीच्या राजकारणाचे खच्चीकरण करण्याचा प्रयत्न देशपातळीवरील काँग्रेस नेतृत्वाने पद्धतशीरपणे केला त्याचबरोबर मराठा जातीतील नेतृत्वातही फाटाफूट झालेली दिसून येते, जागतिकीकरण, मंडल आयोगाच्या पार्श्वभूमीवर इतर मागास जातीच्या अस्मिता जाग्या झाल्या व त्या राजकारणात सक्रिय सहभाग घेऊन सत्तेत वाटा मिळवू लागल्या त्याचबरोबर इतर मागास जातीमध्ये जाती संघटनांचा उदय होऊ लागला परिणामी मराठा राजकारणाला शह बसू लागला व मराठा समाजाची आपण राजकारणात डावलले जात आहे अशी धारणा बनत गेली. या धारणेतून समाजाला एकत्र करण्यासाठी मराठा जातीतही अनेक संघटनांचा उदय होऊ लागला.

## जात व राजकारण

ब्रिटिश काळातील जातिव्यवस्थेच्या पारंपरिक संघटनेमध्ये महत्वपूर्ण बदल झालेले आहेत स्वातंत्र्यानंतरच्या काळात उदार लोकशाही, भांडवलशाही विकासाचे मॉडेल, राजकीय अर्थव्यवस्था इत्यादींच्या स्वीकारामुळे या बदलात गुंतागुंत होताना दिसते. तसेच औद्योगीकरण, शहरीकरण वाढीबरोबर समकालीन जातींचे स्वरुप गुंतागुंतीचे बनले.[१]

राजकारण व समाजातील जाती हा घटक अभ्यासकांचे लक्ष वेधून घेण्यास तीन प्रक्रिया महत्वाच्या आहेत. पहिली प्रक्रिया - आर्थिक क्षेत्रातील बलामुळे जाती व व्यवसाय यातील पारंपरिक स्वरूपाचे संबंध बदलले





त्याचबरोबर जाती-जातीत व जाती अंतर्गत स्तरीकरणाचा उदय झाला. दुसरी प्रक्रिया म्हणजे जातीचे राजकीयीकरण झाले, तर तिसरी प्रक्रिया म्हणजे जातीच्या अस्मितेचे राजकारण सुरु झाले.[२] या सर्व प्रक्रियेमुळे जात व राजकारण यांची बेमालुम सरमिसळ होत जाऊन जात ही राजकारणाची पूर्वअट बनताना दिसते.

## महाराष्ट्राचे राजकारण व मराठा जात

१ मे १९६० रोजी महाराष्ट्र राज्याची निर्मिती झाली असली तरी जात आणि राजकारण यांच्या परस्पर संबंधांची पायाभरणी ब्रिटिश राजवटीच्या काळात झालेली होती. मराठा समाजामध्ये विसाव्या शतकाच्या सुरुवातीलाच ब्राह्मणेतर चळवळीमुळे राजकीय सत्तेबद्दल जागरूकता निर्माण झाली. ब्रिटिश सरकार जे अधिकार देऊ करीत होते त्यातील अधिकाधिक वाटा मिळविण्याचे प्रयत्न ब्राह्मण, मराठा इ. जाती गटांनी केले त्यातूनच महाराष्ट्रात जातीच्या राजकारणाने आकार घेतला.[३]

महाराष्ट्राच्या निर्मितीनंतर जवळपास दोन दशके महाराष्ट्राच्या राजकारणावर मराठा जातीच्या नेतृत्वाची निर्विवाद पकड असलेली दिसते. यशवंतराव चव्हाण यांनी बहुजनवादी राजकारण करत सर्व जाती घटकाला सोबत घेऊन मराठा राजकारणाला सर्व जातीय आधार मिळवून दिला होता. पंचायतराज, सहकारी संस्था, साखर कारखाने इ. माध्यमातून गावपातळीपासून ते विधानसभा पातळीपर्यंत राजकीय सत्तेचे एक जाळे तयार झाले. सहकार चळवळ व पंचायतराज यांच्या माध्यमातून नवीन राजकीय नेतृत्व उदयास येत होते व ते टिकून राहण्याचा प्रयत्न करत होते. १९८० नंतर मराठा नेतृत्वामध्ये यशवंतरावांचा गट, शंकरराव चव्हाणांचा गट, वसंतदादा पाटलांचा गट, शरद पवारांचा गट, नंतरच्या काळात विलासराव देशमुखांचा गट, अशोकराव चव्हाणांचा गट अशा वेगवेगळ्या गटात रस्सीखेच सुरू झाल्यामुळे महाराष्ट्रातील मराठा जातीचे जे वर्चस्व होते ते विभागणी होण्यास सुरुवात झाली. त्याचबरोबर मराठा समाज कॉंग्रेसऐवजी वेगवेगळ्या राजकीय पक्षात विभागला गेला. इतर मागास जातींचा राजकारणातील उदय, जमातवादी राजकारण, शेतीऐवजी सेवा क्षेत्राकडे झुकत असलेले अर्थकारण, वाढत चाललेले शहरीकरण, मोडीत निघत असलेल्या सहकारी संस्था यामुळे १९८० व १९९० नंतर महाराष्ट्रातील मराठा जातीचे राजकारण गुणात्मक ऐवजी संख्यात्मक बळावरच स्थिरावले. आपल्या हातून सत्ता जात आहे याची खदखद मराठा समाजामध्ये असलेली दिसते. एकेकाळी वर्चस्वशाली असणारी जात आज अस्तित्वासाठी झगडताना दिसते. मराठा जातीला हे वर्चस्व पुन्हा प्राप्त करून देण्यासाठी मराठा जातीमध्ये वेगवेगळ्या जात संघटनाचा उदय झालेला दिसतो.

## मराठा वर्चस्वाचे आधार

समाजशास्त्रज्ञ एम. एन. श्रीनिवास यांनी भारताच्या संदर्भात 'वर्चस्वशाली जात' ही संकल्पना मांडून जात आणि वर्चस्व यांच्यातील परस्पर संबंध दाखविला. त्यांनी वर्चस्वशाली जात निर्माण होण्यासाठी इतर जातीच्या तुलनेने असणारी अधिक लोकसंख्या, सामाजिक आणि आर्थिक ताकद आणि स्थानिक जातिव्यवस्थेच्या उतरंडीत फारसे कनिष्ठ स्थान नसणे ही वैशिष्ट्ये सांगितली आहेत. त्यांनी मांडलेले वर्चस्वशाली जातीचे आधार

महाराष्ट्रातील मराठा जातीस लागू पडतात. महाराष्ट्रात मराठा जातीचे वर्चस्व निर्माण होण्याचे आधार शोधक येतात ते पुढीलप्रमाणे.

१. महाराष्ट्रातील मराठा जातीच्या वर्चस्वाचा पहिला आधार म्हणजे मराठा जातीची असणारी अधिक लोकसंख्या हा होय.

१. १९३१ सालच्या जनगणनेनुसार राज्यात मराठा-कुणबी या जाती समूहाची एकत्रित लोकसंख्या ३१ टक्के होती. त्याचबरोबर हा समाज राज्यभर पसरलेला पाहायला मिळतो.

२. अधिक संख्या असल्यामुळे हा समाज लोकशाही व्यवस्थेमध्ये सत्तेतसुद्धा अधिक असणार हे साहजिकच आहे.

३. अनेक वर्षापासून असलेले मराठा जातीचे आर्थिक व राजकीय वर्चस्व व त्याची जाणीव आणि ते टिकवून ठेवण्यासाठी एकत्र येण्याची मराठा जातीची तयारी हे मराठा वर्चस्वाचे महत्वाचे वैशिष्ट्ये होय.

४. ब्राह्मणेतर चळवळीच्या काळात मराठा या मोठ्या जातसमूहात जातिभान निर्माण झालेले पाहायला मिळते. या जातिभानात जशी पारंपरिक स्थानाची जाणीव होती तशीच लोकशाही राजकारणात नेतृत्व करण्याची इच्छासुद्धा होती त्यामुळे मराठा जातीचे वर्चस्व जवळपास १९८० पर्यंत टिकवता आले.

५. मराठा-कुणबी या जाती अंतर्गत पोटभेदावर मराठा जातीने यशस्वीरीत्या मात केली त्यातून मराठा जातीचे वर्चस्व निर्माण झाले.

६. ब्राह्मणेतर चळवळीतून बहुजन ही संकल्पना पुढे आली व महाराष्ट्र निर्मितीनंतर मराठा नेतृत्वाने बहुजनवादी राजकारण करत मराठेतर जातीच्या हितरक्षणाची भूमिका घेतली. त्यामुळे साहजिकच मराठा वर्चस्व प्रस्थापित होऊ शकले.

७. मराठा जातीकडे असलेली जमीन मालकी, इतर शेतकरी जातीच्या मानाने चांगल्या सुपीक जमिनीची अधिकांशाने असलेली मालकी हा मराठा वर्चस्वाचा महत्वपूर्ण आधार ठरतो.

८. सहकारी चळवळीमुळे सहकारी बँका, सहकारी साखर कारखाने, सहकारी पतसंस्था इ. सहकारी संस्थानिर्मितीमुळे मराठा समाजाच्या भौतिक वर्चस्वात वाढ झाली.

९. पंचायतराज व्यवस्थेमुळे ग्रामीण स्तरापासून ते विधानसभा स्तरापर्यंत मराठा समाज सत्तेशी जोडला जाऊन एक जाळे तयार झाले यातून मराठ्यांचे वर्चस्व निर्माण झाले.

१०. मराठा वर्चस्वाचे आधार यशवंतराव चव्हाण यांच्या कालखंडात विकसित होत गेले. आर्थिक व राजकीय क्षेत्रात संस्थात्मक आधारांची उभारणी करून मराठा व इतर बहुजन कार्यकर्त्यांना समावून घेण्यात आले हे धोरण चव्हाण मॉडेल म्हणून ओळखले जाते.

याप्रक्रियेतून महाराष्ट्रामध्ये मराठा वर्चस्व निर्माण झालेले दिसून येते.

मराठा जातीमधील अभिजन आणि सामान्यजन यांच्यात तफावत असूनही ते एकत्र येतात याला मराठेशाहीतील वर्चस्वाची परंपरा कारणीभूत आहे. हे विश्लेषण जयंत लेले यांना अपुरे वाटते. त्यांच्या मते ...





वर्चस्वाला धुरीणत्वाची जोड आहे म्हणून हे वर्चस्व अनेक वर्षे टिकू शकले.[४] हे लक्षात घेणे अत्यावश्यक आहे. कारण मराठा वर्चस्व हे केवळ संख्याबळावर टिकले नाही तर याला जनसामान्यांची सहमती मिळालेली दिसते. लोकशाहीमध्ये जनसंमतीशिवाय नेतृत्व टिकू शकत नाही आणि मराठा नेतृत्व अशी जनसंमती मिळवण्यात यशस्वी झालेले दिसते. अशी जनसंमती यशवंतराव यांच्या व शरद पवार यांच्या राजकारणाला मिळालेली दिसते.

मराठा वर्चस्वाच्या जडणघडणीची चर्चा सुहास पळशीकर यांनी 'जात व महाराष्ट्रातील सत्ताकारण' या पुस्तकात केली आहे. त्यांच्या मते ब्राह्मणेतर चळवळीने एका मोठ्या समूहामध्ये मराठा जातिभान निर्माण केले या जातिभानात पारंपरिक स्थानाची जाणीव व आधुनिक संदर्भात राजकीय नेतृत्व करण्याची आकांक्षा यांचा मिलाफ झालेला दिसतो. मराठा कुणबी ऐक्य व संख्याबळ, मराठा समाजाची शेतीची मालकी, भौतिक वर्चस्वाचा विस्तार करणारी सहकारी चळवळ, लोकशाही विकेंद्रीकरणासाठी निर्माण करण्यात आलेल्या त्रिस्तरीय स्थानिक शासनयंत्रणा यामुळे मोठ्या प्रमाणात मराठा समाज सत्तायंत्रणाशी थेट जोडला गेला. तसेच यशवंतराव चव्हाण यांनी मराठा समाजाचे हितसंबंध आणि मराठी अस्मिता यांची सांगड यशस्वीपणे घातली. विविध मार्गांनी मराठा नेतृत्वाला ब्राह्मणविरोधाचे परिमाण राहणार नाही याची दक्षता घेतली. त्यामुळे १९६० नंतरचे मराठा वर्चस्व हे ब्राह्मणविरोधी राहण्याऐवजी ब्राह्मण हितसंबंध जोपासणारे असेच राहिले.[५] या सर्व जडणघडणीततून महाराष्ट्रात मराठा जातीचे वर्चस्व निर्माण झालेले दिसून येते.

मराठा-कुणबी समाज आणि अभिजनांच्या वर्चस्वाचे आधार किंवा या समाजाची वैशिष्ट्ये म्हणजे राज्यभर पसरलेली लोकसंख्या, शेत जमिनीवरील मालकी, सहकार क्षेत्रावरील वर्चस्व, स्थानिक स्वराज्य संस्थांवर नियंत्रण तसेच आपला प्रभाव टिकवण्यासाठी इतर मागास जातींना बरोबर घेण्यासाठी स्वीकारलेली बहुजनवादी राजकारणाची संकल्पना होय.[६]

**मराठा वर्चस्वाचा ऱ्हास**

महाराष्ट्रातील मराठा वर्चस्व कमी होण्यासाठी किंवा मराठा वर्चस्वाचा ऱ्हास होण्यासाठी पुढील घटक कारणीभूत ठरलेले आहेत.

**१. इंदिरा गांधी यांचे मराठा वर्चस्वाच्या खच्चीकरणाचे राजकारण**

महाराष्ट्र राज्याच्या निर्मितीपासून महाराष्ट्रातली राजकीय सत्ता मराठा नेतृत्वाकडे राहिली. १९८० पर्यंत यशवंतराव चव्हाण यांचा राज्यात प्रभाव होता. [७] राष्ट्रीय पातळीवर काँग्रेसची सूत्रे इंदिरा गांधीकडे आल्यावर त्यांनी महाराष्ट्रात मराठा नेतृत्वाची सत्ता कमी करण्याचा प्रयत्न जाणीवपूर्वक सुरू केला. काँग्रेसमध्ये अखिल भारतीय पातळीवर १९६९ मध्ये फुट पडली. १९६९ च्या पक्षांतर्गत संघर्षात स्थानिक पातळीवरील प्रस्थापित नेतृत्व आपल्याला साथ देत नाही हा अनुभव इंदिरा गांधी यांना आला. त्यामुळे या प्रस्थापित नेतृत्वावर विसंबून राहण्यापेक्षा त्यांना बाजूला सारून फक्त आपल्या व्यक्तिगत प्रतिमेच्या आधारे निवडणुका जिंकण्याची रचना इंदिरा गांधी यांनी आखली.[८] म्हणजेच स्थानिक पातळीवर राजकारणात पाळेमुळे असलेल्या नेत्यांचे खच्चीकरण करणे हा त्या व्युव्हरचनेचा एक अटळ भाग होता. परंतु त्याकाळात महाराष्ट्रातील नेतृत्व एवढे प्रबळ होते की, ते कायम

ठेवून आपल्या नेतृत्वाला धोका निर्माण करणे इंदिरा गांधी यांना परवडणारे नव्हते. म्हणून १९७१-७२ पासून महाराष्ट्रात मराठा नेतृत्वाचे प्रस्थ मोडून काढण्यासाठी अब्दुल रहेमान अंतुले, नाशिकराव तिरपुडे इ. नेते १९७० पासूनच्या इंदिरा गांधी यांच्या यशवंतराव विरोधी व्यूहात सामील झाले.[९] सहकारी चळवळीचे बळ आणि मराठा जातीसमाजाचा पाठिंबा यामुळे १९७१-७२ च्या निवडणुकांमध्ये मराठा नेतृत्वाला पूर्णपणे बाजूला ठेवणे इंदिरा गांधी यांना शक्य झाले नाही. त्याचबरोबर इंदिरा गांधी यांच्या व्यूहनितीचा दुसरा भाग म्हणजे राष्ट्रीय पातळीवर दीनदुबळे, पददलित, आदिवासी, मागासवर्गीय, अल्पसंख्य यांचे तारणहार असल्याचा दावा इंदिरा गांधी यांनी १९७१ पासूनच करायला सुरुवात केली होती. गोरगरिबांचे तारणहार ही प्रतिमा प्रस्थापित मराठा नेतृत्वाला वाव देणे या प्रतिमेशी विसंगत ठरत होती.

जयंत लेले यांच्या मते इंदिरा गांधींच्या व्यूहरचनेचा भाग म्हणजे काँग्रेस पद्धतीतून तिला राबवून राज्य पातळीवर आपले नेतृत्व स्थिर करू शकतेले प्रबळ मुख्यमंत्री बदलून जे आपल्या मुठीत राहतील असे मुख्यमंत्री नेमने होय. प्रस्थापित नेतृत्वाला बाजूला करून त्याच पद जरा कमजोर स्पर्धकाला द्यायचं म्हणजे दोघेही आपल्यावर अवलंबून राहतात व आपलं स्थान बळकट होतं असे त्यातले आडाखे होते.[१०] तसेच इंदिरा गांधींनी लोकानुरंजनवादी पद्धतीने दलित, मुस्लिम, शहरातील असंघटित कामगार, बेकार व बेकारीच्या उंबरठ्यावर येऊन ठेवलेले सुशिक्षित तरुण-तरुणी यांना गरिबी हटावच्या आणि बारीक-सारीक प्रलोभनाने झुलवायला सुरुवात केली.

२. मराठा नेतृत्वात फूट

१९७२ पासूनच्या काँग्रेस अंतर्गत धुसफुशीच्या पार्श्वभूमीवर काँग्रेसमधील फूट हा महाराष्ट्राच्या राजकीय चौकटीच्या भवितव्याच्या दृष्टीने तसेच मराठा धुरीणत्वाच्या व वर्चस्वाच्या राजकारणाच्या दृष्टीने एक ऐतिहासिक टप्पा होता.[११] महाराष्ट्रात मराठा नेतृत्वात फाटाफूट झालेली दिसते. यात यशवंतराव चव्हाण, शंकरराव चव्हाण, वसंतदादा पाटील, शरद पवार इ. मराठा नेत्यांमध्ये फाटाफूट व सत्तेसाठी रस्सीखेच झालेली पाहायला मिळाली. नेमक्या ज्या काळात इंदिरा गांधी मराठा नेतृत्वास शह देत होत्या त्याच काळात हे घडले त्यामुळे मराठा नेतृत्व विस्कळीत झाले ते कायमचेच. अलीकडच्या काळात महाराष्ट्रामध्ये विलासराव देशमुख, अशोकराव चव्हाण असे मराठा नेतृत्वाचे गट पाहायला मिळाले.

मराठा नेतृत्वातील फूट आणि त्या नेतृत्वाची दुर्बलता या दोन्ही गोष्टी १९८० च्या दशकापासून सुरु झाल्या. १९९० च्या दशकातही कायम राहिल्या. बंडखोरीच्या रूपाने त्या दिसून आल्या १९९० च्या विधानसभा निवडणुकीतही काँग्रेसला निसटता विजय मिळाला, तर १९९५ मध्ये मोठ्या प्रमाणावर बंडखोरी होऊन काँग्रेसच्या हातून राज्याची सत्ता गेली, या अर्थाने १९८० नंतर मराठा नेतृत्वाच्या हातून राज्यातील सत्ता गेली आणि त्याबरोबर काँग्रेसचीही सत्ता गेली.

३. मराठा नेतृत्वाचे गुणात्मक नाही तर संख्यात्मक वर्चस्व

मराठा धुरीणत्वाची व नेतृत्वाची पीछेहाट झाली म्हणजे मराठा नेतृत्वाचा अंत झाला असे म्हणता येणार नाही. कारण मराठा नेतृत्वाच्या हातून सत्ता गेली तरी जमीन मालकी, सहकारी संस्थांचे नियंत्रण, स्थानिक शासन





यंत्रणा यावर मराठा नेतृत्व शिल्लक आहे. परंतु हे जे मराठा नेतृत्वाचे भौतिक आधार आहेत याच्याही पुढे १९९० नंतर खाऊजा (खाजगीकरण-उदारीकरण-जागतिकीकरण) धोरणाने आव्हान उभे केले आहे. हे सर्व आधार खिळखिळे होण्यास सुरुवात झालेली आहे. तसेच १९९० च्या दशकात मराठा नेतृत्वापुढे गंभीर पेचप्रसंग निर्माण झालेले आहेत यात शंका नाही. १९९५ साली मोठ्या प्रमाणात बंडखोरी होऊन काँग्रेसच्या हातून राज्याची सत्ता गेली. एकंदरीत मराठा राजकारणाची कोंडी, काँग्रेसची पडझड, शेतकरी संघटना व शिवसेनेचे राजकारण, सेवा क्षेत्राचा उदय आणि इतर मागास जातीचे राजकारण यामुळे महाराष्ट्रात १९९५ ला सत्तांतर घडून आले. म्हणजे १९९५ नंतर संख्यात्मकदृष्ट्या मराठा समाजाचे अस्तित्व महाराष्ट्राच्या राजकारणात शिल्लक राहिले पण गुणात्मकदृष्ट्या महाराष्ट्राच्या राजकारणात मराठा समाजाचे अस्तित्व नगण्य होत चाललेले दिसते.

४. इतर मागास जातीच्या राजकारणाचा उदय

इंदिरा गांधींच्या मराठा वर्चस्याच्या खच्चीकरणाच्या राजकारणामुळे आणि मंडल आयोगाच्या शिफारशीमुळे इतर मागास जातीचे राजकारण उदयाला आले. १९८० च्या दशकात इतर मागास जातींनी मराठा व काँग्रेस विरोधी राजकारण सुरू केले. महाराष्ट्रात इतर मागास जातीचे दोन गट आहेत त्यापैकी एक गट म्हणजे शेतकरी जातीचा त्यामध्ये माळी-धनगर-वंजारी (माधवं) या जातीचा समावेश होतो. तर दुसरा गट म्हणजे कारागीर जातीचा होय यामध्ये सुतार, शिंपी, सोनार इ. जातीचा समावेश होतो. इतर मागास जातीमध्ये माळी, धनगर, वंजारी या तीन जातीकडे जमीनमालकी असून या संख्येने अधिक असणाऱ्या जाती आहेत. त्यामुळे १९८५ नंतरच्या काळात माळी, धनगर, वंजारी जातीमध्ये राजकीय महत्त्वाकांक्षा निर्माण झाल्या विविध राजकीय पक्षांनी त्यांची दखल घेत या जातीच्या नेत्यांना अधिक वाव दिला. त्यामुळे माळी जातीतून छगन भुजबळ, ना. स. फरांदे, धनगर जातीतून शिवाजीराव शेंडगे, अण्णा डांगे, वंजारी जातीतून गोपीनाथ मुंडे या सारखे नेते विविध पक्षात उदयास आले.[१२] यामुळे मराठा राजकारणावर मर्यादा आलेली दिसते.

मराठा वर्चस्वासमोर निर्माण झालेल्या आव्हानामुळे मराठा जातीचे राजकारणातील गुणात्मक वर्चस्व कमी होत चालल्यामुळे मराठा समाजात अस्वस्थता निर्माण झाली. ही अस्वस्थता घालवण्याचा व सर्व समाजाला एकत्र ठेवण्याचा उद्देश ठेवत मराठा जात संघटना उदयास येऊ लागल्या.

मराठा वर्चस्वाच्या ऱ्हासाचे परिणाम

१. १९९० नंतरचे बदलते अर्थकारण व राजकारण

स्वातंत्र्योत्तर काळात शेतकी अर्थव्यवस्थेमुळे मराठा जातीला राजकीय वर्चस्व निर्माण करता आले असले तरी १९९० नंतर बदललेल्या अर्थकारणामुळे मराठा जातीची जी बलस्थाने होती तीच कच्चे दुवे ठरू लागली. महाराष्ट्रातील शेती पावसाच्या पाण्यावर अवलंबून आहे. महाराष्ट्र राज्याच्या निर्मितीनंतर धरण बांधून जलसिंचनाची सोय करण्याचा प्रयत्न केलेला असला तरी १९६० पासून २००१ पर्यंत केवळ १७.५ टक्के एवढीच सिंचन क्षमता वाढली आहे. थोडक्यात जलसिंचन सुविधेचा अभाव, पावसाची अनिश्चितता यामुळे शेतीतून नफ्याची शाश्वती नाही, तसेच शेतीचा अर्थव्यवस्थेतील वाटा कमी झाल्याने शेतीचे अर्थकारणातील महत्त्व घटले.

परिणामी राजकारणातील शेत जमीन मालकांचे वर्चस्व आणि महत्व कमी होऊ लागले. तसेच नव्या अर्थव्यवस्थेने ग्रामीण भागात रोजगाराच्या अनेक नवीन संधी निर्माण केल्या त्यामुळे सामाजिक प्रतिष्ठेचे निकषही बदलू लागले. उपजत घटकापेक्षा अर्जित कौशल्याच्या आधारे उत्पादनाची साधने असणाऱ्यांना समाजात प्रतिष्ठा मिळू लागली. त्यामुळे राजकारण प्रभावित करणारे घटकही बदलले. शिक्षण घेतलेले, नोकरी असणारे किंवा व्यवसाय करणारे यांना समाजात प्रतिष्ठा मिळू लागली. गावात मोठ्या प्रमाणात शेतजमीन आहे, परंतु शिक्षण नसलेल्या कुटुंबांना समाजात पूर्वीसारखी प्रतिष्ठा राहिली नाही. या सर्व घटकांमुळे राजकीय प्रक्रियेत बदल घडू लागले.[१३] म्हणजेच ग्रामीण भागात शिक्षणाचा प्रसार वाढल्याने व शेती व्यतिरिक्त व्यवसायाच्या अनेक संधी निर्माण झाल्याने शेतीचे महत्व कमी झाले. पर्यायाने राजकीय प्रक्रियेतील सत्ता मिळवून देण्याचे एक साधन म्हणून शेतीचे असलेले महत्वही कमी झाले.(१४) त्यामुळे शेतीव्यतिरिक्त उपजीविकेची साधने असणाऱ्या व्यक्ती स्थानिक राजकारणात यशस्वी होताना दिसतात. बदललेल्या राजकीय अर्थकारणाचा परिणाम राजकारणावर होत गेला. शेतीशी निगडित नसलेल्या व्यक्तीकडे राजकीय सत्तेचा लंबक सरकत आहे, त्यामुळे महाराष्ट्रातील पूर्वीचे राजकीय समीकरणे बदलत आहेत.

### २. जातीचे राजकीयीकरण

लोकशाही व्यवस्थेत बहुमताला महत्व असल्याने संख्यात्मक ताकद असलेल्या समूहाला राजकीय सत्ता मिळण्याची दाट शक्यता असते. त्यातच भारतीय समाजातील जाती व्यवस्थेवर लोकशाहीचा परिणाम होऊन जातीचे राजकीयीकरण होण्यास सुरुवात झाली. समाज जातीच्या आधारावर एकत्र येऊन शासनावर दबाव टाकून मागण्या मान्य करून घेऊ लागला. त्यामुळे सर्व जातींमध्ये जातीय संघटना निर्मितीची प्रक्रिया वेगाने घडून आली.[१५] या प्रक्रियेचा परिणाम मराठा जातीवर होणेही सहाजिकच होते. त्यामुळे मराठा जातीतही अनेक जात संघटनांचा उदय झाला.

### ३. अस्मितेच्या राजकारणाचा उदय

१९९० नंतर जागतिकीकरणाने भारतीय अर्थव्यवस्थेत आमूलाग्र बदल घडवून आणले. याच वेळी राजकारणातही स्थित्यंतरे होत गेली. कॉंग्रेस व्यवस्थेचा ऱ्हास होऊन आघाडीच्या राजकारणाची सुरुवात याच कालावधीमध्ये झाली. प्रादेशिक पक्षांची संख्या व ताकद वाढली. भारतीय लोकशाही तळागाळातील समुहापर्यंत पोहोचली. त्यातून जे समूह राजकीयदृष्ट्या सक्रिय नव्हते त्यांच्यामध्ये नवे राजकीय आत्मभान आणि सत्तेत वाटा मागण्याची इच्छा निर्माण झाली. भारतीय समाजाची विभागणी जातीच्या आधारावर होत असल्याने जातीय अस्मिता तीव्र बनून विविध जातीमध्ये जातभान या काळात निर्माण झाले. त्यातून भारतीय राजकारणात अस्मितेच्या राजकारणाला महत्व मिळाले. जातीच्या संघटना उभारणे, जातीतील पराक्रमी पुरुषांचा आणि स्त्रियांचा राजकीय हेतूने वापर करणे, पुतळे, जातीचे झेंडे, जातीचे प्रतीके निर्माण करणे, जातीचे अधिवेशने भरवणे इत्यादी माध्यमातून या जातीय अस्मिता तीव्र बनत गेल्या[१६] आणि जात संघटनाच्या उदयाची प्रक्रिया सुरु झाली.





### ४. वाढती बेकारी

सुमार अर्थव्यवस्था, देशभरातील मध्यमवर्गाची वाढती सत्ता, जमातवादी राजकारण आणि जागतिकीकरणाच्या जादूत रमलेला राज्यकर्ता यांच्या पार्श्वभूमीवर नव्वदीतील राजकारण अधिकाधिक तत्कालिक, नाटकी, जनहित विरोधी आणि उथळ झाल्याचे महाराष्ट्रामध्ये दिसते. तसेच बेकारी, दारिद्रय यांचेही प्रमाण वाढलेले दिसते. यातूनच तरुणांमध्ये नैराश्य आलेले दिसते ते घालवण्याचे ध्येय ठेवत 'मराठा सेवा संघप्रणित संभाजी ब्रिगेड' चा उदय झालेला दिसतो.[१७]

### ५. राज्याच्या संसाधन वाटपावर प्रभाव टाकण्यासाठी

१९९० नंतर विविध जातींमध्ये जाती संघटनाची निर्मिती झाली. जातीचा आधार घेत विविध छोट्या-मोठ्या जाती एकत्र येऊन राज्यसंस्थेवर प्रभाव पाडण्याचा प्रयत्न करत होत्या. काही जातीतील लोक नोकरीच्या ठिकाणी अडचणी आल्यास जातीय संघटनांचा आधार घेत संकटावर मात करत होते. या सर्व घटनांचे निरीक्षण प्रत्येक जातीतील मध्यमवर्ग करत होता. आपणही संघटित असावे, आपल्याही जातीच्या संघटना असल्या पाहिजेत याची जाणीव व आवश्यकता या वर्गाला जाणवत होती. लोकशाही शासन व्यवहारांमध्ये संघटित झाल्यास राज्याच्या संसाधन वाटप करण्याच्या प्रक्रियेवर प्रभाव टाकता येतो. याची जाणीव या वर्गाला झाल्याने संघटनांची आवश्यकता जाणवू लागली. या आवश्यकतेतूनच 'मराठा सेवा संघाचा' उदय झालेला आहे.

### मराठा सेवा संघाचा उदय

महाराष्ट्रात बहुसंख्य असलेल्या मराठा-कुणबी जातीतही प्रामुख्याने १९८०-१९९० नंतर अनेक जात संघटनाचा उदय झाला. यात अखिल भारतीय मराठा महासंघ, अखिल भारतीय छावा मराठा युवा संघटना, छावा मराठा युवा संघटना, बुलंद छावा, शिवसंग्राम, मराठा सेवा संघ इ. या काही संघटनांच्या नावांमध्ये अखिल भारतीय असे असले तरी त्यांचे विशेष कार्यक्षेत्र महाराष्ट्र हेच असलेले दिसून येते. मराठा जातीत अशा वेगवेगळ्या जाती संघटना निर्माण झाल्यामुळे मराठा समाज वेगवेगळ्या जाती संघटनेमध्ये विभागलेला पाहायला मिळतो.

मराठा समाजातील विविध स्तरावर नोकरीत असलेल्या व सेवानिवृत्त झालेल्या कर्मचाऱ्यांनी एकत्र येऊन पुरुषोत्तम खेडेकर यांच्या अध्यक्षतेखाली मराठा सेवा संघाची १ सप्टेंबर १९९० रोजी स्थापना केली.[१८] सुरुवातीला या संघटनेत राजकारण येऊ नये म्हणून नोकरदार वर्गाची संघटना असावी असा आग्रह होता, परंतु जे सेवक कर्मचारी नाहीत पण काम करण्याची इच्छा आहे अशा लोकांना जोडून घेण्यासाठी मराठा समाजाची प्रगती करण्याचे ध्येय ठेवत शास्त्रशुद्ध आखणी करत मराठा सेवा संघाचा समाजाच्या कार्याच्या विभागणीनुसार ३१ कक्षामध्ये विस्तार व विकास करण्यात आलेला आहे.

आज या संघटनेला स्थापना होऊन तीस वर्षाचा कालावधी झालेला आहे. गेली तीन दशके महाराष्ट्राच्या सामाजिक जीवनात ही संघटना वावरत असताना दिसते. तसेच या संघटनेने अनेक क्षेत्रांमध्ये व मराठा समाजाच्या अनेक स्तरांमध्ये वेगवेगळ्या कक्षामार्फत आपल्या कामाला सुरुवात केलेली आहे. संघटना स्थापनेच्या उद्देशापैकी काही उद्देश साध्य करण्यात संघटनेला निश्चित यश आलेले आहे.

**संघटनेची उपलब्धी**

१. मराठा सेवा संघाने ३१ कक्षाद्वारे समाजाच्या सर्व स्तरांना जोडण्याचा प्रयत्न केलेला आहे.

२. मराठा सेवा संघाने इतर जातीय व इतर धर्मीय सलोखा निर्माण करण्यात यश मिळवलेले आहे.

३. मराठा सेवा संघाची सुरुवातीची राजकारण नको ही भूमिका बदलत जाऊन संघटनेने 'शिवराज्य प[क्ष]' स्थापन करून स्वतंत्र राजकारण करण्याचा प्रयत्न केला. शिवराज्य पक्षाद्वारे गरीब श्रीमंत दरी क[मी] करून समतेवर आधारित शिवराज्य आणण्याचे ध्येय संघटनेने ठेवले आहे. नंतरच्या काळात 'संभा[जी] ब्रिगेड' हा राजकीय पक्षसुद्धा अस्तित्वात आलेला पाहायला मिळतो. या राजकीय पक्षाच्या माध्यमातून संघटना राजकारण करण्याचा प्रयत्न करत आहे.

४. मराठा सेवा संघाने हिंदू धर्माला पर्यायी शिवधर्म देण्याचा प्रयत्न केलेला आहे.

५. मराठा-कुणबी समाजाने राजसत्ता, धर्मसत्ता, अर्थसत्ता, शिक्षणसत्ता आणि प्रचार प्रसार माध्यमसत्ता ह[स्तगत केली] घेतली पाहिजे ही संघटनेची भूमिका आहे.

६. मराठा सेवा संघ ही संघटना सांस्कृतिक क्षेत्रात हिंदू धर्मातील देवदेवता व सण उत्सवाला पर्याय देण्या[चे] काम करत आहे. हिंदू देवदेवता ऐवजी ऐतिहासिक स्त्री-पुरुषांना पुढे आणण्याचा प्रयत्न सुरू आहे.

७. सरसकट मराठ्यांना ओबीसी आरक्षण मिळाले पाहिजे ही संघटनेची आरक्षणाबाबतची भूमिका असलेले पाहायला मिळते.

८. मराठा सेवा संघ ही संघटना आधुनिक शिक्षण व विद्येचा आग्रह धरताना दिसते.

९. या संघटनेमुळे आज मराठा तरुण लेखन करत आहेत त्यांच्यामध्ये वाचन संस्कृतीही वाढत आहे.

१०. मराठा सेवा संघाची सर्वात महत्त्वाची उपलब्धी म्हणजे या संघटनेमुळे मराठा स्त्रिया सामाजिक जीवनात आत्मविश्वासाने वावरायला लागल्या.

**मराठा सेवा संघ संघटनेच्या मर्यादा**

१. मराठा सेवा संघाने महाराष्ट्राच्या राजकारणात स्वतंत्र राजकीय पक्ष स्थापन करून राजकारण करण्याचा प्रयत्न केलेला असला, तरी त्याद्वारे त्यांना प्रस्थापित राजकारणाला पर्याय देता आला असे दिसत नाही.

२. मराठा सेवा संघाने धार्मिक क्षेत्रांमध्ये हिंदू धर्माला पर्यायी शिवधर्म देण्याचा प्रयत्न केलेला आहे. प[रंतु] संघटनेच्या सदस्या व्यतिरिक्त संपूर्ण मराठा समाजाने शिवधर्माचा स्वीकार केलेला दिसत नाही.

३. जात संघटनेमुळे जातीय अस्मिता वाढण्यास हातभार लागतो.

४. मराठा सेवा संघ इतर जातींना सोबत घेत बहुजनवादी राजकारण करण्याचा प्रयत्न करत आहे. या[तून] प्रस्थापित राजकारणाला पर्याय उभा राहाताना दिसत नाही.

५. सरसकट मराठ्यांना ओबीसी आरक्षण ही संघटनेची आरक्षणाबाबतची भूमिका संकुचित स्वरूपाची दिसते.[१९]





संघटनेच्या स्थापनेपासून ते आजपर्यंत जवळपास तीन दशके ही संघटना महाराष्ट्राच्या सामाजिक जीवनामध्ये काम करताना दिसते. तसेच मराठा समाजातील इतर जाती संघटनाच्या तुलनेत ही सर्वात मोठी जात संघटना आहे व या संघटनेचे महत्वाचे वेगळेपण म्हणजे ही संघटना इतर जातीय व इतर धर्मीय सलोखा निर्माण करण्याचा प्रयत्न करत आहे आणि या प्रयत्नात काही प्रमाणात संघटनेला यशही मिळालेले दिसते. मराठा ऐक्य व विकास हे मराठा सेवा संघाचे ध्येय असून इतर समाजाला सोबत घेणे हे संघटनेचे धोरण असलेले दिसते.

**निष्कर्ष**

महाराष्ट्रामधील मराठा जातीच्या बदलत्या राजकारणाच्या पार्श्वभूमीवर मराठा सेवा संघ या मराठा जात संघटनेचा उदय झालेला दिसतो.

१. ब्राह्मणेतर चळवळीतून मराठा समाजामध्ये जागृतता निर्माण झालेली दिसते यामुळेच १९९० नंतरच्या बदलत्या राजकीय परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर मराठ्यांचे राजकारणातील महत्त्व कमी होत असल्यामुळे मराठा जातीतील लोकांनी एकत्र येत विविध मराठा जाती संघटनांची स्थापना केली त्यातील एक म्हणजे मराठा सेवा संघ होय.

२. महाराष्ट्रामध्ये पद्धतशीरपणे इंदिरा गांधी यांनी मराठा जातीचे वर्चस्व कमी करत मराठा जातीला डावलण्याचे राजकारण केले. यामुळे राजकारणातील मराठा जातीचे स्थान धोक्यात यायला लागले.

३. मराठा नेतृत्वामध्ये विविध गटांमध्ये फूट पडली आणि सत्तेसाठी रस्सीखेच सुरु झाली यामुळे मराठा वर्चस्व विस्कळीत होण्यास हातभार लागलेला दिसतो.

४. मंडल आयोगाच्या अंमलबजावणीनंतर इतर मागास जातींच्या राजकीय अस्मिता वाढीस लागल्या याचा परिणाम मराठ्यांच्या राजकारणाला शह मिळण्यात झाला.

५. जागतिकीकरणानंतर मराठा वर्चस्वाचे शेतजमीन, सहकार हे महत्त्वाचे आधार होते ते खिळखिळे होण्यास सुरुवात झाली.

६. सर्वच जातीमध्ये जात म्हणून एकत्र येण्याची प्रक्रिया जोरात सुरू झाली त्यातून जातीय संघटनांचा उदय होऊ लागला.

७. मराठा समाजाला डावलले जाते व मराठा समाजावर अन्याय होतोय ही भावना वाढीस लागली यामुळे मराठा जाती संघटनांचा उदय झालेला दिसतो.

८. मंडल आयोगाने मराठा-कुणबी ऐक्यामध्ये निर्माण केलेली फुट जोडण्यासाठी व सरसकट मराठ्यांना एकत्र आणण्यासाठी मराठा सेवा संघ ही संघटना उदयास आली.

**सारांश**

महाराष्ट्र निर्मितीपासून महाराष्ट्रामध्ये मराठा जातीचे वर्चस्व निर्माण झाले परंतु या वर्चस्वाला इंदिरा गांधीने कमकुवत करण्याचा प्रयत्न केला. त्याचबरोबर मराठा नेतृत्वाच्या फाटाफुटीमुळे हे वर्चस्व कमी होण्यास हातभार लागला. १९९० नंतर महाराष्ट्रामध्ये बदलत्या अर्थकारण व राजकारणामुळे मराठा जातीला आपले वर्चस्व

टिकवणे अवघड होत गेले. मराठा वर्चस्वाचे प्रमुख आधार म्हणजे शेती, सहकार व संस्थात्मक राजकारण यांच्यापुढे महत्वाचे आव्हाने उभे राहिली. सर्वच राजकीय पक्षांनी इतर मागास जातीच्या नेतृत्वाला राजकारणात वाव देण्यास सुरुवात केली. तसेच ७३ व ७४ व्या घटना दुरुस्तीनुसार स्थानिक राजकारणामध्ये सुद्धा आरक्षण धोरण लागू केल्यामुळे मराठा नेतृत्वाला राजकारणात संधी मिळणे अवघड होत गेले. यातून मराठा समाजावर अन्याय होतोय ही भावना वाढीस लागून मराठा जातीमध्ये वेगवेगळ्या जाती संघटनाचा उदय झाला त्यातील एक प्रमुख आणि महत्वाची जात संघटना म्हणजे मराठा सेवा संघ होय. महाराष्ट्रामध्ये मराठा जातीचे वर्चस्व निर्माण करायचे असेल तर बहुजनवादी राजकारण हाच एकमेव मार्ग आहे. स्वतःच्या जातीचे वर्चस्व टिकवत असताना इतर जातीयांना पण सामावून घेणे हा बहुजनवादी राजकारणाचा आत्मा आहे.

संदर्भ सूची

१. Deshpande Rajeshwari, Inevitability and Inadequacy of Caste : Some Dilemmas for Mobilization of Backward Caste, B.V. Bhosale (ed.) 2004, Mobilization of Backward Communities in India,Delhi, Deep and Deep Publication.(Page.201)
२. Deshpande Rajeshwari - Caste Association in the Post Mandal Era(2010) (page 1-5)
३. पळशीकर सुहास,२००३, 'जात व महाराष्ट्रातील सत्ताकारण', पुणे, सुगावा प्रकाशन,(पृष्ठ.१३).
४. लेले जयंत, १९९०, 'महाराष्ट्रातील निवडणूक आणि मराठ्यांचे धुरीणत्व', समाज प्रबोधन पत्रिका, एप्रिल-जून.
५. पळशीकर सुहास,२००३, 'जात व महाराष्ट्रातील सत्ताकारण', पुणे, सुगावा, (पृष्ठ.१९-२०).
६. घोटाळे विवेक,२०१७, मराठा वर्चस्वाचे बदलते आकृतीबंध, विद्यावाचस्पती पदवी पदासाठी सादर केलेला अप्रकाशित शोधप्रबंध, राज्यशास्त्र व लोकप्रशासन विभाग सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे, (पृष्ठ.८)
७. पवार प्रकाश, १९९६, 'अखिल भारतीय मराठा महासंघ', एम. फिल. पदवी पदासाठी सादर केलेला अप्रकाशित प्रबंध, राज्यशास्त्र व लोकप्रशासन विभाग, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे, (पृष्ठ.३३).
८. पळशीकर सुहास,२००३, 'जात व महाराष्ट्रातील सत्ताकारण', पुणे, सुगावा, (पृष्ठ.२४).
९. व्होरा राजेंद्र, सुहास पळशीकर,१९९६, 'महाराष्ट्रातील सत्तांतर', मुंबई, ग्रंथाली प्रकाशन, (पृष्ठ.४).
१०. लेले जयंत, १९९०, 'महाराष्ट्रातील निवडणूक आणि मराठ्यांचे धुरीणत्व', समाज प्रबोधन पत्रिका, एप्रिल-जून
११. पळशीकर सुहास,२००३, 'जात व महाराष्ट्रातील सत्ताकारण', पुणे, सुगावा, (पृष्ठ.२५).
१२. Vora Rajendra,Suhas Palshikar,Yashwant Sumant, A Study of the 6th Loksabha Election Maharashtra Report Submitted to ICSSR,1981.
१३. आवारे अंकुश, नामदेव पवार, २०१७, मराठा क्रांती मोर्चा वृत्तांत आणि विश्लेषण', पुणे, हर्मीस प्रकाशन,(पृष्ठ.५९-६०)





१४. आवारे अंकुश,२०१६, बदलती जमीन धारणा व त्याचा महाराष्ट्राच्या राजकारणावर पडणारा प्रभाव अहमदनगर जिल्हा एक अभ्यास', पीएच.डी. पदवी पदासाठी सादर केलेला अप्रकाशित प्रबंध, राज्यशास्त्र व लोकप्रशासन विभाग, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे,(पृष्ठ.२०६).
१५. आवारे अंकुश, नामदेव पवार, २०१७, मराठा क्रांती मोर्चा वृत्तांत आणि विश्लेषण', पुणे, हर्मीस प्रकाशन,(पृष्ठ.६२).
१६. उपरोक्त, (पृष्ठ.७०).
१७. पवार नामदेव, २०१६(द्वि.आ.), 'संभाजी ब्रिगेड एक चिकित्सा', पुणे, जिजाई प्रकाशन, (पृष्ठ.४२-४३).
१८. साळुंखे आ.ह.,पुरुषोत्तम खेडेकर, नेताजी गोरे, २००५, 'शिवधर्म प्रकटन भूमिका', पुणे, जिजाई प्रकाशन, (पृष्ठ.१८).
१९. पवार नामदेव, २००९, 'मराठा सेवा संघप्रणित संभाजी ब्रिगेड : एक चिकित्सक अभ्यास (विशेष संदर्भ मराठवाडा)', एम. फिल. पदवी पदासाठी सादर केलेला अप्रकाशित लघु शोधप्रबंध, राज्यशास्त्र व लोकप्रशासन विभाग, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे, (पृष्ठ.१०५-११२).

# Current Global Reviewer

UGC Approved International Research Refereed Journal For All Subjects & All Languages

ISSN 2319-8648 | Impact Factor - 2.143 | Indexed (IIJIF | UGC Approved Sr. No. 64310

SPECIAL ISSUE

21 April, 2018, Issue: I Vol. I


# आरक्षण धोरणाचे पुनर्विलोकन आणि सुधारणा

# Review and Reforms of Reservation Policy


Chief Editor

Dr. V.L. Yerande

Principal,

Maharashtra Mahavidyalaya, Nilanga

Editor

Dr. Hansraj D. Bhosale



www.rjournals.co.in

**SPECIAL ISSUE**

21 April, 2018 Issue: I Vol. I

# आरक्षण धोरणाचे पुनर्विलोकन आणि सुधारणा

# Review and Reforms of Reservation Policy

**Chief Editor**
**Dr. V.L. Yerande**
Principal,
Maharashtra Mahavidyalaya, Nilanga

**Editor**
**Dr. Hansraj D. Bhosale**
Department of Marathi,
Maharashtra Mahavidyalaya, Nilanga

CURRENT GLOBAL REVIEWER
Special Issue | UGC Approved | ISSN : 2319 - 8648
Issue I Vol I, 21 April 2018 | Sr. No. 64310 | Impact Factor : 2.143

# Index


| | | | |
|---|---|---|---|
| | संपादक मंडळ | | |
| | शुभेच्छा संदेश ... | डॉ. शिवाजीराव पाटील निलंगेकर | |
| | संपादकीय | डॉ. व्ही.एल. एरंडे | 1-12 |
| | बीजभाषण<br>सामाजिक मागासलेपणाच्या आडून जातीय आरक्षण : पुनर्विलोकन व सुधारणा अनिवार्य | डॉ. बाळासाहेब सराटे | 13-23 |

| भाग.- १ (पाटीदार आंदोलन आणि आरक्षणाची मागणी) | | | |
|---|---|---|---|
| | Social Analysis of Patidar Agitation in Gujarat | Sangita Patel (Gujarat) | 24-28 |
| | पाटीदार आंदोलन : एक समीक्षा | डॉ. एस.के.गोयल मध्यप्रदेश | 29-35 |
| | Patidar Reservation Agitation | Dr. Kanti Kiran David (Madhya Pradesh) | 36-41 |
| | पाटीदार, जाट, गुर्जर आणि मराठा आरक्षण : राष्ट्रव्यापी आंदोलनाची गरज | प्रा. उध्दव कोळपे | 42-44 |
| | मराठा, पाटीदार समाजाच्या आंदोलनाची प्रस्तुतता | प्रा. नामदेव अशोक पवार | 45-48 |
| | मराठा व पाटीदार समाजाची सामाजिक, आर्थिक स्थिती आणि आरक्षणाची आवश्यकता | होगे राधाकिशन आंबादासराव | 49-54 |

| भाग- २ आरक्षणाची संवैधानिक चौकट आणि कायदेशिरता | | | |
|---|---|---|---|
| १ | महाराष्ट्रातील खत्री व बापट आयोगाचे अहवाल आणि तामीळनाडूतील आरक्षण : एक अभ्यास | ॲड. बाळासाहेब सराटे | 55-62 |
| २ | Demand of Reservation by So Called Socially Forward Castes under OBC Quota: (A Study of Marathas Reservation in Maharashtra and of Patel in Gujarat) | Dr. V. L. Yerande<br>Naresh V. Pinamkar | 63-72 |
| ३ | Who are the New '*Shudras*' Today? | Dr. Kamlakar Gavane | 73-83 |
| ४ | Reservation: an Affirmative Action and Constitutional Provisions in India | Dr. Ajit Murlidharrao Mulajkar | 84-90 |

CURRENT GLOBAL REVIEWER
Special Issue
Issue I Vol I , 21 April 2018
UGC Approved
Sr. No. 64310
ISSN : 2319 - 8648
Impact Factor : 2.143

# मराठा, पाटीदार समाजाच्या आंदोलनाची प्रस्तुतता

**प्रा. नामदेव अशोक पवार**
*कला, विज्ञान आणि वाणिज्य , महाविद्यालय, इंदापूर जि.पुणे.*

**प्रस्तावना-**

मागील एक दशकांपासून देशातील तथाकथित सामाजिक दृष्ट्या प्रगत समजल्या जाणा-या मराठा, जाट, पाटीदार, गुर्जर इत्यादी जाती समुहांकडून शिक्षण व शासकीय सेवेत आरक्षण मिळावे यासाठी फार मोठ्या प्रमाणात आंदोलने झाली. मराठा समाजाची आंदोलने वगळता इतर समाज घटकांनी हिंसक आंदोलने केली. हार्दिक पटेल या तरुण नेत्याच्या नेतृत्वाखाली गुजरात मध्ये हिंसक आंदोलने झाली. या सर्व आंदोलनाच्या पार्श्वभुमीवर या आरक्षणाच्या मागण्या त्यांनी उभारलेली आंदोलने आणि त्या आंदोलनाची प्रस्तुतता यावर प्रकाश टाकावा या हेतूने प्रस्तुत लेखात मराठा, पाटीदार समाजाच्या आंदोलनाची स्थितीगती याचा वेध घेण्याचा प्रयत्न केला आहे. महाराष्ट्रात मराठा, हरियाणामध्ये जाट तर गुजरातमध्ये पटेल या सर्व जाती पहायला मिळतात. महाराष्ट्रात मराठा, हरियानामध्ये जाट तर गुजरात मध्ये पटेल आरक्षणाची मागणी करत आहेत. हरियाणामध्ये जाट समाजाने केलेल्या आंदोलनाला हिंसक वळण लागल्यामुळे पोलिस गोळीबारामध्ये ३० जणांचा मृत्यू झाला. या आंदोलनाचे पडसाद राज्यातील इतर भागामध्ये पडल्याने मोठ्या प्रमाणात हिंसाचार व जाळपोळीच्या घटना घडल्या (इंडियन एक्सप्रेस, २१ मार्च, २०१६) या आंदोलकांपैकी अनेकावर देशद्रोहाचे गुन्हे नोंदवले गेले. या आंदोलनात मृत्युमुखी पडलेले तरूण नोकरीत आरक्षण मिळावे ही मागणी करत होते. गुजरातमध्ये पाटीदार समाजाने केलेल्या आंदोलनात ९ जणांचा मृत्यू झाला . (इंडियन एक्सप्रेस, २७ ऑगस्ट, २०१५) या आंदोलनाच्या नेत्यावर देशद्रोहाचा गुन्हा दाखल करण्यात आला.

जाट , पटेल आणि मराठा या तिन्ही जाती शेतजमीनीची मालकी असणा-या आहेत. २०१५ आणि २०१६ मध्ये या तिन्ही जातींनी इतर मागास वर्गात समावेश व्हावा म्हणून आंदोलने झालेली आहेत. जाट आणि पटेल यांच्या आंदोलनाच्या पार्श्वभुमीवर मराठा आंदोलन वेगळे ठरते. कारण जाट व पटेलांच्या आंदोलनाला हिंसक वळण लागले त्यामुळे अल्पावधीतच ही आंदोलने विरून गेली राज्यसंस्थेने दमन कारी शक्ती वापरत ही आंदोलने चिरडून टाकली. याउलट मराठा मोर्चाबाबत शासन अत्यंत हतबल झालेले पहायला मिळाले .मूकपणे निषेध करणा-या आंदोलकांना कोणत्याही प्रकारे दडपून टाकणे शासनास शक्य नव्हते . त्यामुळे मराठा मोर्चांचे आंदोलन महात्मा गांधीनी दाखवलेल्या अहिंसात्मक मार्गाचे एक मोठे यश होते. या आंदोलनातील संयम, स्वयंशिस्त वाखाणण्याजोगी होती.

**आंदोलनाची दशा :-**

लोकशाही शासनपध्दतीमध्ये शासन व्यवहारावर राजकीय पक्ष नियंत्रण ठेवण्याचे काम करतात. राजकीय पक्ष आपले काम चोखपणे पार पाडण्यात असमर्थ ठरत असतील तर दबावगट ती जबाबदारी पार पाडतात. दबावगटांना अपयश आले तर समाज रस्त्यावर उतरून व्यवस्था परिवर्तनाची मागणी करतो. जाट, पटेल व मराठा इ.समाजाला भेडसावणारे प्रश्न सोडवण्यात राजकीय पक्ष व दबावगट अपयशी ठरल्यामुळेच या सर्व जाती रस्त्यावर उतरून आग्रही आविष्कार करत आहेत .या आंदोलनाचे महत्वपूर्ण यश म्हणजे सर्व जातीतील मध्यमवर्ग आज सक्रिय झालेला पहायला मिळतो. या सर्व आंदोलनामध्ये राजकीय पक्षांना स्थान नव्हते, किंवा विचारधारा सुध्दा नव्हती. भारतीय राजकारणाचा

विचार करता जाट, पटेल, मराठा या जाती आप-आपल्या राज्यातील प्रमुख जाती आहेत. सत्ताधारी जाती आहेत. सर्वसाधारण समज असा आहे की, या जातीकडे शेती, सत्ता, सहकार, संस्था इ. आहेत. त्यामुळे यांचे सर्वकाही अलबेल आहे. परंतु या सर्व आंदोलनातून या जातींनी आपले सर्व काही अलबेल नाही आपल्या जाती मध्ये सुध्दा वर्गीय स्तरीकरण आहे. या सर्व जातीमध्ये आर्थिकदृष्ट्या विपन्नावस्थेत असणारा व सर्व बाजूने पिचला गेलेला एक खुप मोठा वर्ग आहे. या वाईट अवस्थेत जाणा-या समुहाला जातीमुळे व्यवस्थेचे कोणतेही फायदे मिळालेले नाहीत. तो आरक्षणापासून राजकीय सत्तेपासून किंवा जाती आधारित मिळणा-या बहुविध फायदयापासून आजसुध्दा कोसोमैल दूर आहे. ही बाब प्रथमतः या आंदोलनामुळे अधोरेखित झाली.

जाट, पटेल आणि मराठा या आंदोलनामुळे पहिल्यांदा या जातींच्या वास्तव दशेवर चर्चा सुरू झाली ही चर्चा सर्वांगाने सुरू झाली. या जातीवर आधारित आंदोलनाने गर्दीचे सर्व उच्चांक मोडीत काढले. एवढेच नव्हे तर आंदोलनानंतर सर्व काही व्यवस्थित होईल असा भ्रामक आशावाद निर्माण करण्यात ही आंदोलने यशस्वी ठरली. या सर्व आंदोलनातून अपेक्षित परिणाम साध्य करण्यात या जाती अपयशी ठरल्या हे निर्विवाद सत्य आहे. निश्चित विचारप्रणाली, प्रभावी व डोळस नेतृत्व आणि सुयोग्य संगठन या सर्वांच्या अभावामुळे या सर्व आंदोलनाला निश्चित दिशा मिळू शकली नाही.

**आंदोलनाची दिशा :-**

भारतीय माणसांना आणि त्यातल्या त्यात महाराष्ट्रीयन माणसांना नेहमीच इतिहासाविषयी आकर्षण व अतिप्रेम असलेले पहायला मिळते. या सर्व शेतकरी जातीनी आपण किती भव्य - दिव्य मोर्चे काढले. या मानसिकतेतून बाहेर येत वस्तुस्थितीला डोळ्यासमोर ठेवून आंदोलनाला काय दिशा देता येईल याचा विचार व तशी कृती करणे आज अपरिहार्य होउन बसले आहे आपापल्या जातीतील लोकांचे प्रबोधन करणे, लोकांमध्ये ज्ञानलालसा निर्माण करणे आवश्यक आहे.

स्वांतत्रोत्तर काळात संख्येने बहुसंख्य असलेल्या तसेच शेती व भौतिक साधन सामग्रीवर मालकी असलेल्या जातींनी आपापल्या राज्यात राजकीय वर्चस्व निर्माण केले. परंतू १९९० नंतर खा- उ- जा ( खाजगिकरण- उदारीकरण- जागतिकीकरण ) धोरणाच्या आगमनानंतर अर्थकारण वेगाने बदलत गेले. माहिती व तंत्रज्ञान क्षेत्रात क्रांती घडून आली. त्यामुळे अर्थव्यवस्थेमध्ये महत्वपूर्ण भूमीका बजावू शकणारे अनेक नवनवीन क्षेत्रे उदयास आली.

१९९० नंतर भारतीय अर्थव्यवस्थेने विकास दरापेक्षा अधिक विकास दराने विकास केला. कोणतेही अर्थव्यवस्था दिर्घकाळ १ किंवा १.५ टक्के दराने वाढत असेल तर एका पिढीनंतर त्या समाजातील आर्थिक व सामाजिक कार्ये बदलतात. त्या समाजात नवीन कौशल्याची आवश्यकता निर्माण होते . (पिकेटी, २०१४, ८५) त्यामुळे भारतातही वेगाने वाढत जाणा-या अर्थव्यवस्थेमुळे नवीन आर्थिक आणि सामाजिक कौशल्य आवश्यक असलेली क्षेत्रे उदयास आली. ज्या व्यक्तीने किंवा समूहाने या बदलाशी जोडून घेतले, त्या समुहांना वर्चस्व टिकवता आले व जे या बदलाशी जोडून घेउ शकले नाहीत, त्यांचे हितसंबंध १९९० नंतर धोक्यात आले. जाट, मराठा पटेल या जातींना अशा बदलांशी जुळवून घेणे अवघड झाल्याने त्यांचे वर्चस्व आणि अस्तित्व धोक्यात आले. यातून त्यांना आपण असुरक्षित आहोत असे वाटू लागले.

शिक्षण , शहरीकरण , शासनाच्या मागास वर्गीयासाठींच्या विविध योजना आणि लोकशाही राजकारण यामुळे समाजामध्ये संरचनात्मक पातळीवर बदल होउ लागले (सेठ, २००८, ९५) यामुळे मागास जातीमध्ये राजकीय आत्मभान

येण्यास सुरूवात झाली राजकारणातले शेतीचे महत्व दिवसेंदिवस कमी होत गेले. शेती व्यतिरीक्त रोजगाराची नवनवीन क्षेत्रे उदयास आली. १९९० नंतर राज्यकर्त्यांनी कृषी हितसंबंध जोपासण्याऐवजी औद्योगिक आणि सेवाक्षेत्राचे हितसंबंध जोपासणे पसंद केले. त्यामुळे शेती व शेतकी क्षेत्रासमोर पेचप्रसंग उभा राहिला.

देशाच्या राजकारणात शेतकी हितसंबंधांना दुय्यम स्थान मिळत आहे त्यामुळे शेती क्षेत्राशी निगडीत राजकारण करणा-या जातींच्या राजकारणासमोर आव्हाने निर्माण झाली. त्याचबरोबर आज दिवसेंदिवस शहरी लोकसंख्या वाढत आहे. शेती क्षेत्राचा अर्थव्यवस्थेतील वाटा घटत चालला आहे. सेवा क्षेत्र झपाटयाने वाढत आहे. मागास जातींचे राजकीय आत्मभान वाढत आहे या सर्व बदलामुळे वर्चस्वाशाली जातीच्या वर्चस्वाला आव्हाने निर्माण झालेली आहेत.

ही जातीय आंदोलने या सर्व आव्हानांचा वेध घेउन व्यवस्था परिवर्तनाचे मॉडेल पुढे आणण्यात यशस्वी ठरलेले दिसत नाहीत. एवढा प्रचंड जनसमुदाय रस्त्यावर उतरल्यानंतर खरे तर व्यवस्था बदलाची दाट शक्यता असते पण अशी शक्यता आंदोलकांच्या हातून निसटलेली दिसते. पण या सामाजिक आंदोलनातून काही आशादायक व दिशादर्शक बाबीसुध्दा पुढे आलेल्या आहेत. विशेषतः आंदोलने कशी असावीत त्याचे संघटन आणि व्यवस्थापन कसे असावे याचे उत्तम उदाहरण म्हणजे महाराष्ट्रातले मराठा आंदोलन होय.

मराठा आंदोलनामध्ये कमालीचा नागरिक - प्रशासन समन्वय पहायला मिळाला. एरवी भारतीय प्रशासन व नागरिक यांच्यात एक प्रकारचे वितुष्ट असल्याचे दिसते पण मोर्चात प्रशासन नागरिक समन्वयाचे अनोखे रूप पहायला मिळाले. असाच समन्वय जर दैनंदिन जीवनामध्ये उतरला तर समाज व राष्ट्र विकासासाठी तो फायदेशीर ठरू शकते.

जाट, पटेल, आणि मराठा आंदोलनामुळे या जातीतील मध्यम वर्ग /स्तर सक्रिय झाला, जागतिकीकरणानंतर मात्र हा मध्यमवर्ग आत्ममग्न व सामाजिक व्यवहारापासून फटकून वागत होता. त्याचे अराजकीयकरण वेगाने झाले होते समाजाला विधायक वळण देण्यापासून हा वर्ग दूर गेल्याने सामाजिक , राजकीय आणि सांस्कृतीक क्षेत्रातील नेतृत्व खुज्या व्यक्तिकडे गेले. त्यामुळे सर्वसामान्यांच्या व कष्टक-यांच्या प्रश्नाला वाचा फोडणारा प्रभावी वर्ग राहिला नाही. पण अशा आंदोलनातून हा मध्यम वर्ग पुढे येत आहे. ही विधायक बाब आहे. परंतु या मध्यम वर्गाला स्वजातीय परीघाबाहेर काढून सर्वजातीय हितासाठी कार्यरत करणे हे मोठे आव्हान आहे .

सर्वच आंदोलनातून सोशल मिडीयाचा प्रभावी वापर करण्यात आला. सोशल मिडीयाच्या माध्यमातून सर्व समाज एकवटता येतो हा आशावाद निर्माण होण्यास मदत झाली. जगभर सोशल मिडीयाचा प्रभावी वापर करत आज जनआंदोलने उभा राहत आहेत. येथून पुढे आंदोलनाची दिशा ठरवत असताना सोशल मिडीया कळीची भूमिका निभावणार आहे . त्यामुळे सोशल मिडीयाचा वापर सामाजिक ऐक्य व जनहित साधण्यासाठी करणे गरजेचे आहे.

मराठा आंदोलनातील सर्वात आशादायक बाब म्हणजे महिलांचा सहभाग आणि पुढाकार हे होय. जागतिकीकरणानंतर देशभरस्त्रियांवर होणा-या अत्याचाराचे प्रमाण वाढत चालले आहे. स्त्री अत्याचारासंदर्भात चंगळवादी, हिंस्त्र, भणंग, मानसिकता दिसते आहे. या अत्याचाराविरोधात महिला रस्त्यावर उतरत आहेत आणि पुढाकार घेत आहेत. ही निश्चितच आशादायक बाब आहे.

**समारोप:-**

भारतात सामाजिकदृष्ट्या पुढारलेल्या समाजाची यात जाट, मराठा, पटेल इ, जातींचे आंदोलने उभे राहण्यापाठीमागे कृषी क्षेत्रातील अरिष्ट, बेकारी , बेरोजगारी इ. घटक कारणीभूत आहेत. या पेचप्रसंगामुळे मराठा, जाट, व

पटेल या जातीसमोर अस्तित्वाचा प्रश्न निर्माण झालेला आहे. साहजिकच त्यामूळे एक असंतोष, भिती, असुरक्षितता निर्माण झालेली आहे. या संकटावर मात करण्यासाठी शेतकरी जाती व इतर सर्व जातीय तरूणांमध्ये वर्गीय भान येणे गरजेचे आहे. असे न होता बेकार व बेरोजगार तरूणांना आरक्षणाचे स्वप्न दाखवले जात आहे. यातून जातीय अस्मिता वाढत आहेत. हे वेळीच रोखण्यासाठी सर्वजातीय विचारवंत, बुध्दीवंत , अभ्यासक इ. नी पुढे येत सर्वांचे प्रबोधन घडवले पाहिजे. व या आंदोलनाला एक दिशा दिली पाहिजे, तरच देशात शांतता व सुव्यवस्था नांदेल परिणामी देशाला उन्नती साध्य करता येईल.

वास्तविक पहाता वर उल्लेख केलेल्या ज्या समाजघटकांनी आंदोलने केली ते घटक शेतकरी बहुल आहेत. जागतिकीकरणानंतर शेती व्यवसायावर आरिष्ठ आल्यामुळे हे सर्वच समाज आर्थिक दृष्ट्या विवंचनेत सापडले आहेत. त्यांच्यात सामाजिक वंचनभाव निर्माण झाल्यामुळे या आर्थिक विपन्नतेला पर्याय म्हणून प्रस्थापित व्यवस्थेविषयी राग व्यक्त करुन आरक्षणाची मागणी करतात, असे दिसून येते. तेंव्हा त्या-त्या घटक राज्यातील मागासवर्ग आयोगाने त्यांच्या सामाजिक मागासलेपण शास्त्रीय पध्दतीने शोधून शासनाकडे सकारात्मक पध्दतीने अहवाल सादर करणे क्रमप्राप्त आहे.

**संदर्भ सुचीः-**

1. Piketty Thomas, 2014, Capital in the Twenty First Century, London, the Belnap Press of Harvard University Press.
2. Seth D. L. 2008 , Caste in Modern India, New Delhi, Oxford University Press.
3. The Indian Express News Paper
4. आवारे अंकुश , नामदेव पवार, २०१७, मराठा क्रांती मोर्चा वृतान्त आणि विश्लेषण , पुणे , हर्मिस प्रकाशन.
५. पवार नामदेव , जातींच्या मोर्चानंतर , पुरोगामी सत्यशोधक , ऑक्टोबर - नोव्हेंबर - डिसेंबर २०१७.
६. दै. लोकसत्ता .



COVID-19

# महाराष्ट्र

## वार्षिकी 2022


संपादक

तुकाराम जाधव

विवेक घोटाळे

मुक्ता कुलकर्णी





THE UNIQUE FOUNDATION

*Social Intervention Through Education*

## भाग ५


| | | |
|---|---|---|
| ▪ एफपीओ वाला योगेश ! (सहाशे शेतकरी उत्पादक संस्थांना एकत्रित आणणारा तरूण) | निशिकांत भालेराव | २६३ |
| ▪ भाजीपाल्याचे कॉर्पोरेटायझेशन | योगेश बिडवई | २६६ |
| ▪ माझा चंदनशेतीचा प्रयोग | दीपक रमेशचंद्र शहा | २७६ |
| ▪ विद्याताई रुद्राक्ष - शेतीतील निऋतीच्या लेकीची भेट | लोकमित्र संजय काशीनाथ सोनटक्के | २७९ |
| ▪ दुष्काळी गांव ते पाणीदार गावाचा प्रवास : अनोरे | डॉ. संदिप भाऊराव नेरकर | २८२ |
| ▪ भोगाव तलावाचे पुनरुज्जीवन - निसर्गप्रेमी प्राचार्य डॉ. संध्याताई दूधगावकर यांची यशोगाथा | डॉ. राजेंद्र इंगळे । महेश भोसले | २८७ |
| ▪ लामकानी: शाश्वत विकासाच्या दिशेने पाऊल टाकणारं गावं | संदीप धिवरे | २९२ |
| ▪ शिक्षणाची पार्श्वभूमी नसणाऱ्या मुन्नाचे बिजनेस मॉडेल | प्रविण राठोड | २९५ |
| ▪ महिला सक्षमीकरणाची आनंदगाथा | प्रा. नामदेव पवार | २९८ |

प्रत्येक ग्रामसभेत महिलाकेंद्री निर्णय होत होते. गावातील सर्व घरे महिलांच्या नावे करण्याचा अभिनव प्रयोग सुरू झाला. लग्न व इतर कार्यात महिलांच्या जेवणाच्या पंगती पुरुषानंतर होत. ही प्रथा गावाने मोडून महिला प्रथम ही विवेकी प्रथा सुरू केली. हिमोग्लोबिन तपासणी, मासिक पाळी स्वच्छतेविषयी जागृती, सॅनेटरी नॅपकिन भेट इत्यादी उपक्रम राबवले. हुंडा मुक्त गाव, कन्या दान, शुभ कार्यात विधवांना सहभागी करून विधवा सन्मान इत्यादी उपक्रम राबवून महिलांना प्रतिष्ठा दिली.

# महिला सक्षमीकरणाची आनंदगाथा

**प्रा. नामदेव पवार**
namdevpawar11@gmail.com

आनंदवाडी हे लातूर जिल्ह्यातील निलंगा तालुक्यातील गाव. या गावची लोकसंख्या ६३५ असून या गावात ११२ घरे आहेत. महात्मा गांधी यांच्या स्वप्नातील खेडे म्हणजे आनंदवाडी होय. गावाचा प्रवास स्वतःची स्वतंत्र ओळख नसणे, यापासून ते गाव विकासाचे रोल मॉडेल बनण्यापर्यंत झाला. गौर ग्रामपंचायतीमधून वेगळे होऊन १९९३-९४ साली आनंदवाडी गावाला स्वतंत्र ग्रामपंचायती दर्जा मिळाला. दोन गटांत विभागलेले गाव विठ्ठल मंदिर उभारण्यासाठी एकत्र आले. गावाच्या राजकारणावर देवस्थान मंडळाचा प्रभाव होता. तो मोडून ग्रामपंचायतीचे ग्रामसभेचे महत्त्व प्रस्थापित केले.

महाराष्ट्र शासनाची लोकसहभाग पुरस्कृत यशवंतराव चव्हाण ग्रामसमृद्धी योजना व लोकसहभागातून ग्रामपंचायत कार्यालय उभे राहिले. २००५ साली आनंदवाडी ग्रामपंचायातीचे सरपंचपद महिलांसाठी आरक्षित झाले. या संधीमुळेच गाव विकासाची व महिला सक्षमीकरणाची प्रक्रिया सुरू झाली. पहिल्या महिला सरपंचाने पहिला निर्णय घेतला, तो म्हणजे गाव हागणदारीमुक्त करण्याचा. पहिल्याच ग्रामसभेत महिला मोठ्या प्रमाणात सहभागी झाल्या. शौचालये नसल्यामुळे महिलांची होणारी कुचंबना, मानहानी व आरोग्यहानी यांसाठी हागणदारीमुक्त गाव किती महत्त्वाचे आहे, हा विचार पुढे आला. घरात शौचालय बांधणे ही बाब लोकांना रुचत नव्हती. सरपंचासह काही समविचारी लोकांनी आधी केले मग सांगितले या उक्तीप्रमाणे स्वतःच्या घरी शौचालय बांधले. या कामाची पावती म्हणजे मा. राष्ट्रपती ए.पी.जे. अब्दुल कलाम यांच्या हस्ते ४ मे २००७ रोजी आनंदवाडी गावाला निर्मलग्राम पुरस्कार देण्यात आला.

प्रत्येक ग्रामसभेत महिलाकेंद्री निर्णय होत होते. गावातील सर्व घरे महिलांच्या नावे करण्याचा अभिनव प्रयोग सुरू झाला. गाव तंटामुक्त झाल्याशिवाय गावाचा शाश्वत विकास साधता येत नाही. त्यामुळे गावातील जातीय सलोखा टिकून राहिला पाहिजे, तो वाढला पाहिजे यासाठी सर्व सांस्कृतिक सण व राष्ट्रीय उत्सव सर्वांनी जाणीवपूर्वक सामूहिक सहभाग घेऊन साजरे करण्यावर भर दिला गेला. लग्न व इतर कार्यात महिलांच्या जेवणाच्या पंगती पुरुषानंतर होत. ही प्रथा गावाने मोडून महिला प्रथम ही विवेकी प्रथा सुरू केली. लग्न खर्च

- आशा कार्यकर्त्या मनीषा तंगडपल्ले यांच्या नेतृत्वाखाली मासिक पाळीबद्दलच्या संवादाचे सामान्यीकरण होणे हे गावाला अभिमानास्पद वाटणाऱ्या बदलांपैकी एक आहे. 'मासिक पाळी ही एक नैसर्गिक प्रक्रिया आहे, मुली माझ्याशी मोकळेपणाने बोलत असल्या तरी त्याबद्दल त्यांच्या आईशी बोलण्यास त्या घाबरतात किंवा लाजतात. आम्ही अंगणवाडीत बसवलेले सॅनिटरी नॅपकीन डिस्पेंसर ५ रुपयांना तीन नॅपकिन देतो. लवकरच आम्ही नॅपकिनची सुरक्षित विल्हेवाट लावण्यासाठी एक मशीनही बसवू.' – **मनीषा तंगडपल्ले**

- तालुक्यातील डोंगरगाव या गावाने सर्व महिलांची पंचायत निवडली होती. पण गौर गावापेक्षा डोंगरगावात लोकांचा त्यांना विरोध झाला. ग्रामपंचायत निवडणूक राजकीय पक्षांच्या चिन्हांवर लढवली जात नाही परंतु उमेदवारांना पक्षांचा पाठिंबा असतो. गौर गावात उमेदवारांची निवड गावकऱ्यांनीच केली होती. गावातील प्रॉपर्टी कार्ड सर्व महिलांच्या नावावर आहेत. स्त्रिया आणि पुरुष दोघेही त्यांच्या शेतात सारखेच कष्ट करतात. – **आ. संभाजी पाटील निलंगेकर**

टाळण्यासाठी मुलींचे लग्न मे महिन्यात एकाच दिवशी करून सर्व भेटवस्तूंचा खर्च लोकवर्गणीतून केला जातो.

महिलांच्या आरोग्याच्या प्रश्नावर या गावाने केलेले कार्य उल्लेखनीय आहे. हिमोग्लोबिन तपासणी, मासिक पाळी स्वच्छतेविषयी जागृती, सॅनेटरी नॅपकिन भेट इत्यादी उपक्रम राबवले. हुंडा मुक्त गाव, कन्या दान, शुभ कार्यात विधवांना सहभागी करून विधवा सन्मान इत्यादी उपक्रम राबवून महिलांना प्रतिष्ठा दिली. रक्षाबंधन सण सामूहिकरीत्या साजरा करण्याची परंपरा गावात सुरू केली. गावातील महिला गावातील पुरुषांना राखी बांधतात आणि भाऊ भेट म्हणून भाऊ बहिणीच्या आरोग्यरक्षणासाठी शिबिरे घेऊन तपासणी व उपचार करतात. नागपंचमी स्मशानभूमीत साजरी करून नागाविषयी असलेली भीती व काही अंधश्रद्धा घालवण्याचा प्रयत्न केला जातो.

पाणी फाउंडेशन पुरस्कृत सत्यमेव वॉटर कप स्पर्धेत ४५ दिवसांच्या प्रत्यक्ष श्रमदानात महिलांचा मोठा सहभाग राहिला आहे. या सर्वांचे एकत्रित फळ म्हणजे तालुकास्तरीय दुसऱ्या क्रमांकाचे दहा लाख रुपयांचे बक्षीस पाणी फाउंडेशन व महाराष्ट्र शासनातर्फे या गावाला मिळाले आहे.

**२०२१ ग्रामपंचायत सर्व महिला बिनविरोध** : आनंदवाडीतील महिला पर्वाच्या उदयानंतर व महिला सक्षमीकरणानंतर निश्चितच पुढचा टप्पा म्हणजे सर्व महिलांनी बिनविरोध निवडून येणे हा होता. तो पूर्ण करून महिलांच्या हाती गावाचा कारभार सोपवला गेला. दोन-वेळा सरपंच राहिलेल्या भाग्यश्री चामे यांच्यामुळे अनेक महिला राजकीयदृष्ट्या सक्रिय झाल्या. ग्रामपंचायतीच्या निवडणुकीत सातही जागा ग्रामसभेच्या बैठकीत एकमताने बिनविरोध निवडून आणल्या. तंटामुक्ती समितीचे अध्यक्षपदही महिलेकडे सोपविण्यात आले आहे. गडचिरोली जिल्ह्यातील मेंढालेखा गावातील नागरिकांनी 'दिल्ली मुंबईत आमचं सरकार, आमच्या गावात आम्हीच सरकार' अशी घोषणा दिली होती. याच्याही पुढे जाऊन 'आमच्या गावात महिला सरकार' पर्यंतचा टप्पा आनंदवाडी गावाने गाठलेला आहे. हा टप्पा निश्चितच आशादायक व प्रेरणादायक आहे.

## संदर्भ


१. चामे ज्ञानोबा, २०२१, निर्मिले अस्तित्व माझे; आनंदवाडीची यशोगाथा, ग्रामपंचायत कार्यालय.

2. Mayura Janwalkar, 2021, After Strides in Social Welfare, Latur Village hands over baton to all Woman Panchayat, The Indian Express, 25 January.



**प्रा. नामदेव पवार (निलंगा)**

प्रगतशील शेतकरी व मराठा समाज संघटनांचे अभ्यासक

# महाराष्ट्र
वार्षिकी 2022

'महाराष्ट्र वार्षिकी : 2022' हा 'द युनिक ॲकॅडमी, पुणे' आणि 'द युनिक फाउंडेशन, पुणे' या संस्थेचा अभ्यास प्रकल्प होय. 'टीम युनिक' आणि युनिक ॲकॅडमी-युनिक फाउंडेशनशी संबंधित हितचिंतक, लेखक, अभ्यासक, प्राध्यापक, पत्रकार, संशोधक, सामाजिक कार्यकर्त्यांच्या सहकार्यातून महाराष्ट्र वार्षिकीचा तेरावा अंक आम्ही प्रकाशित करीत आहोत. कोरोना संकट आणि टाळेबंदीच्या कारणास्तव गतवर्षी आम्ही महाराष्ट्र वार्षिकी प्रकाशित करु शकलो नाहीत.

अजूनही देशासह संपूर्ण जग कोरोना महामारीच्या संकटाचा सामना करीत आहे. सध्य निराशाजनक परिस्थितीतही यंदाच्या वार्षिकीच्या स्वरुपात थोडा बदल करुन केवळ माहितीपर घटना - घडामोडी - समस्या मांडण्याऐवजी त्याची कारणपरंपरा आणि उपाय सुचविणाऱ्या शिवाय काही सकारात्मक प्रयोगाची चर्चा करणाऱ्या आशय संपन्न सविस्तर मांडणी करणाऱ्या लेखांचा समावेश केला आहे. प्रस्तुत वार्षिकीत समाविष्ट 58 लेखांची विभागणी पाच विभागांत करण्यात आली आहे.

प्रस्तुत महाराष्ट्र वार्षिकीचा नव्या स्वरुपातील अंक विविध प्रकारच्या स्पर्धापरीक्षा देणाऱ्या विद्यार्थ्यांना परीक्षांच्या विविध टप्प्यांसाठी, विशेषतः मुलाखतीसाठी आवश्यक चिकित्सक व व्यापक दृष्टिकोन विकसित होण्यासाठी उपयुक्त ठरेल. याशिवाय प्राध्यापक, संशोधक, पत्रकार, पक्ष व सामाजिक चळवळीतील कार्यकर्ते आणि सर्वसामान्य नागरिकांनाही उपयुक्त ठरत आला आहे. याही वर्षाच्या 'महाराष्ट्र वार्षिकी' या संदर्भ ग्रंथाचे आपण चिकित्सक स्वागत कराल, ही अपेक्षा आहे.

किंमत : 300 रु.

THE UNIQUE FOUNDATION
*Social Intervention Through Education*

ISBN No.
9 789392 362132

# संभाजी ब्रिगेड
## एक चिकित्सा

नामदेव पवार

# 'संभाजी ब्रिगेड : एक चिकित्सा'

नामदेव पवार

❑ जिजाई प्रकाशन ❑

❑ जिजाई प्रकाशन क्रमांक : २३७
❑ 'संभाजी ब्रिगेड : एक चिकित्सा' – नामदेव अशोक पवार
SAMBHAJI BRIGADE EEK CHIKITSAA - NAMDEV ASHOK PAWAR
ISBN - 978-81-926521-7-7
❑ © सर्व हक्क सुरक्षित
❑ प्रथमावृत्ती (मैत्री प्रकाशन, लातूर)
१२ जानेवारी २०१४ (जिजाऊ जन्मोत्सव, सिंदखेड राजा)
द्वितीय आवृत्ती
१२ जानेवारी २०१६ (जिजाऊ जन्मोत्सव, सिंदखेड राजा)
❑ मुखपृष्ठ
राजा बडसल, पुणे.
❑ प्रकाशक व मुद्रक
जिजाई प्रकाशन,
५८४, नारायण पेठ, कन्या शाळा बसस्टॉप,
जिजापूर (पुणे) ४११०३०.
फोन नं. : ०२०-२४४७६५३९/२४४९८०३६
www.jijaiprakashan.com
❑ पृष्ठसंख्या – १३६
❑ सेवामूल्य : १०० रुपये
विनंती : कृपया एकमेकांना ग्रंथ-पुस्तकेच भेटस्वरूपात द्या.

( ग्रंथातील विचार लेखकांचे आहेत. प्रकाशक व मुद्रक त्यास सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद पुणे जिल्हा न्यायालयीन हद्दीतच राहतील. खाजगी वितरणासाठी)

## अनुक्रमणिका

प्रस्तावना
मनोगत
१. संभाजी ब्रिगेडच्या उदयाची पार्श्वभूमी
२. संभाजी ब्रिगेड : संघटनात्मक संरचना व नेतृत्व
३. संभाजी ब्रिगेडची वैचारिक भूमिका
४. संभाजी ब्रिगेडचे कार्य
५. निष्कर्ष
संदर्भ सूची

महाराष्ट्राच्या राजकारणाचे एक वैशिष्ट्य आहे ते म्हणजे छत्रपती शिवाजी महाराजांनी स्वराज्याच्या स्थापनेसाठी दिलेला देदीप्यमान लढा. छत्रपती राजाराम महाराजांनी जिंजीपर्यंत विस्तारित नेलेला लढा. हा मराठ्यांचा गौरवशाली इतिहास हा अमूल्य ठेवा आहे. शिवरायांचे स्वराज्य हे सहिष्णू सर्वसमावेशक होते. तळागाळातल्या जाती-जमातींना सामावून घेणारे, सरंजामदारी आणि ब्राह्मणी वर्चस्वापासून मुक्त करणारे होते. शिवाजी महाराजांच्या कार्याची स्फूर्तिदायक शक्ती लक्षात घेऊन राजवाड्यांच्या काळापासून महाराजांचे ब्राह्मणीकरण करण्याचे प्रयत्न झाले. सर्वधर्मसमभावी महाराजाऐवजी 'गो ब्राह्मण प्रतिपालक' आणि 'मुस्लिम व इस्लामविरोधी शिवाजी महाराज' हे बिंबविण्याचा प्रयत्न केला. मराठा सेवा संघ आणि त्यांच्या संभाजी ब्रिगेडने ब्राह्मणांच्या या गोबेल्स तंत्राला पहिल्यांदा अधिकृतपणे छेद दिला. या गोबेल्स तंत्रात एक षडयंत्र होते. छत्रपती शिवाजी महाराजांचे आणि संतश्रेष्ठ तुकारामांच्या वारकरी चळवळीचे हिंदुत्ववादीकरण केले की, सत्ताधारी मराठा जातीचेच ब्राह्मणीकरण होते आणि वैचारिक-धार्मिक व सांस्कृतिक अभिजन म्हणून ब्राह्मणांचेच वर्चस्व कायम राहते. ही त्यातील रणनीती होती. मुस्लिम विरोधाच्या नावाने राष्ट्रवादाची मांडणी केली की, जातींच्या निर्मूलनाचा प्रश्नही बाहेर फेकला जातो, ही रणनीती होती. राष्ट्रवादाच्या नावाखाली संघपरिवार आणि त्यांचा राजकीय पक्ष हेच करीत आहे. या रणनीतीला मराठे काही काळापर्यंत बळीही पडले. मराठा सेवा संघ आणि संभाजी ब्रिगेडची लढाई या रणनीतीला शह देण्यासाठीच आहे.

ISBN - 978-81-926521-7-7
सेवामूल्य : १००/-

COVER: RAJA BADSAL

महाराष्ट्राच्या राजकारणाचे एक वैशिष्ट्य आहे ते म्हणजे छत्रपती शिवाजी महाराजांनी स्वराज्याच्या स्थापनेसाठी दिलेला देदीप्यमान लढा. छत्रपती राजाराम महाराजांनी जिंजीपर्यंत विस्तारित नेलेला लढा. हा मराठ्यांचा गौरवशाली इतिहास हा अमूल्य ठेवा आहे. शिवरायांचे स्वराज्य हे सहिष्णू सर्वसमावेशक होते. तळागाळातल्या जाती-जमातींना सामावून घेणारे, सरंजामदारी आणि ब्राह्मणी वर्चस्वापासून मुक्त करणारे होते. शिवाजी महाराजांच्या कार्याची स्फूर्तिदायक शक्ती लक्षात घेऊन राजवाड्यांच्या काळापासून महाराजांचे ब्राह्मणीकरण करण्याचे प्रयत्न झाले. सर्वधर्मसमभावी महाराजाऐवजी 'गो ब्राह्मण प्रतिपालक' आणि 'मुस्लिम व इस्लामविरोधी शिवाजी महाराज' हे बिंबविण्याचा प्रयत्न केला. मराठा सेवा संघ आणि त्यांच्या संभाजी ब्रिगेडने ब्राह्मणांच्या या गोबेल्स तंत्राला पहिल्यांदा अधिकृतपणे छेद दिला. या गोबेल्स तंत्रात एक षडयंत्र होते. छत्रपती शिवाजी महाराजांचे आणि संतश्रेष्ठ तुकारामांच्या वारकरी चळवळीचे हिंदुत्ववादीकरण केले की, सत्ताधारी मराठा जातीचेच ब्राह्मणीकरण होते आणि वैचारिक-धार्मिक व सांस्कृतिक अभिजन म्हणून ब्राह्मणांचेच वर्चस्व कायम राहते. ही त्यातील रणनीती होती. मुस्लिम विरोधाच्या नावाने राष्ट्रवादाची मांडणी केली की, जातींच्या निर्मूलनाचा प्रश्नही बाहेर फेकला जातो, ही रणनीती होती. राष्ट्रवादाच्या नावाखाली संघपरिवार आणि त्यांचा राजकीय पक्ष हेच करीत आहे. या रणनीतीला मराठे काही काळापर्यंत बळीही पडले. मराठा सेवा संघ आणि संभाजी ब्रिगेडची लढाई या रणनीतीला शह देण्यासाठीच आहे.

ISBN - 978-81-926521-7-7
सेवामूल्य : २००/-

संभाजी ब्रिगेड : एक चिकित्सा | नामदेव अशोक पवार | जिजाई प्रकाशन

COVER : RAJA BADSHA

# संभाजी ब्रिगेड एक चिकित्सा

नामदेव पवार

# मराठा क्रांती मोर्चा

## वृत्तान्त आणि विश्लेषण

अंकुश आवारे | नामदेव पवार

# मराठा क्रांती मोर्चा

## वृत्तान्त आणि विश्लेषण

अंकुश आवारे | नामदेव पवार

हर्मिस
प्रकाशन

Hermes Prakashan, Pune
ISBN : 978-93-85565-23-7

Maratha Kranti Morcha : Vruttant aani Vishleshan
*by* Ankush Aaware | Namdev Pawar

**प्रकाशक आणि मुद्रक**
सुशील धसकटे : हर्मिस प्रकाशन
सर्व्हे नं० १३, डी-१/८, पहिला मजला,
रंग-तरंगजवळ, खटावकर चौक, संभाजीनगर, धनकवडी, पुणे ४११ ०४३.
संपर्क : ९८२२२६६९३९
Email : hermesprakashan@gmail.com

© अंकुश आवारे । नामदेव पवार, २०१७

**पहिली आवृत्ती** ऑक्टोबर २०१७
**मुखपृष्ठ** राजा बडसल

**मूल्य** १८०/-

हर्मिस प्रकाशनाची सर्व पुस्तके bookganga.com या संकेतस्थळावर ऑनलाईन खरेदीसाठी उपलब्ध आहेत.

## अनुक्रम

मनोगत । ४

भाग एक **घटनाक्रम**
कोपर्डी : वणव्याची ठिणगी । ९
औरंगाबाद : मराठा मूक मोर्चाची नांदी । १८
कोल्हापूर : मराठा मूक मोर्चाचा परमोच्च बिंदू । ३२
मोर्चाबाबत शासनाची भूमिका । ५०

भाग दोन **विश्लेषण**
मराठा राजकारणातील स्थित्यंतरे । ५७०
जागतिकीकरण आणि मराठा मोर्चा । ६८
मराठा मोर्चाचे यशापयश । ८३

**परिशिष्टे**
१ । मोर्चाच्या प्रचारासाठी वापरलेल्या प्रतिमा । ९३
२ । विविध ठिकाणी झालेल्या मराठा मोर्चांचे फोटो । १०९
३ । सकल मराठा समाजाने शासनाकडे केलेल्या मागण्यांचे निवेदन । १३७

**संदर्भ** । १६३

कोपर्डीतील घटनेची तीव्रता कशा पद्धतीने वाढली?
औरंगाबादच्या पहिल्या मोर्चाची तयारी कशी झाली?
प्रत्यक्षात मोर्चाचे स्वरूप कसे ठरले?
मोर्चाला एवढ्या मोठ्या प्रमाणात प्रतिसाद कसा मिळाला?
मोर्चामुळे नेमके काय साध्य झाले?

९ ऑगस्ट २०१६ रोजी पहिला **मराठा मूक मोर्चा** औरंगाबादमध्ये निघाला. या मोर्चाने मराठा मूक मोर्चाची वेगळी ओळख निर्माण केली. पुढे महाराष्ट्रात ४८, राज्याबाहेर ५ आणि देशाबाहेर ४ ठिकाणी मराठा मूक मोर्चे निघाले. यात कोट्यवधी लोकांनी सहभाग घेतला. अतिशय शिस्तबद्ध, शांततेत आणि कोणतीही दुर्घटना न घडता हे मोर्चे पार पडले. पण हे सर्व आपोआप घडले नाही. मोर्चाच्या तयारीसाठी अनेकांनी पडद्यामागे राहून प्रचंड मेहनत घेतली. अत्यंत सूक्ष्मपद्धतीने अचूक नियोजन केले. त्यामुळे हे मोर्चे यशस्वी झाले.

**अंकुश आवारे** आणि **नामदेव पवार** या लेखकद्वयांनी कोपर्डी, अहमदनगर, पुणे, औरंगाबाद, कोल्हापूर, नाशिक आदी ठिकाणी निघालेल्या मोर्चांमध्ये प्रत्यक्ष जाऊन मोर्चासाठी आलेल्या अनेक लोकांच्या आणि मोर्चांच्या संयोजकांच्या मुलाखती घेऊन आणि आपल्या अभ्यासाच्या आधारे या पुस्तकाचे लेखन केलेले आहे.

**मराठा मूक मोर्चा** आणि त्यासंबंधीच्या विविध प्रश्नांचा वेध घेणारे आणि त्यामागील कारणांचे विश्लेषण करणारे पुस्तक.

हर्मिस प्रकाशन

hermesprakashan@gmail.com
ISBN: 978-93-85565-23-7
मूल्य : १८०/-

COVER: RAJA BADSAL

# Savitribai Phule Pune University

## School of Open Learning

(Distance Education Program)

**M.A. [Political Science]**
**Second Year**
**PS 211**



# आधुनिक भारतातील राजकीय विचार आणि मूलभूत राजकीय सिद्धांत

# आधुनिक भारतातील राजकीय विचार
# आणि
# मूलभूत राजकीय सिद्धांत

**M.A (Political Science)**
**Second Year**
**PS211**

## SAVITRIBAI PHULE PUNE UNIVERSITY

### School of Open Learning
(Distance Education Program)

लेखक -

**शिवाजी मोटेगावकर**
संशोधक विद्यार्थी, राज्यशास्त्र विभाग,
सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे.
मोबाईल - ९८८१०३९६२१
(आधुनिक भारतातील राजकीय विचार - घटक – १, ३, ४ व ५)

**गंगाधर बनसोडे**
संशोधक विद्यार्थी, राज्यशास्त्र विभाग,
सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे.
मोबाईल - ८२०८०४२१९१
(आधुनिक भारतातील राजकीय विचार - घटक – २)

**प्रा. नामदेव पवार**
कला, विज्ञान आणि वाणिज्य महाविद्यालय, इंदापूर
ता. इंदापूर, जि : पुणे.
Email - namdevpawar11@gmail.com
Mob. 9404170969
(मूलभूत राजकीय सिद्धांत – घटक – १ ते ५)

All rights reserved. No part of this publication which is material protected by this copyright notice may be reproduced or transmitted or utilized or stored in any form or by any means now known or hereinafter invented, electronic, digital or mechanical, including photocopying, scanning, recording or by any information storage or retrieval system, without prior written permission from the Publisher.

Information contained in this book has been published for School of Open Learning, Savitribai Phule Pune University, Pune by VIKAS Publishing House Pvt. Ltd. and has been obtained by its Authors from sources believed to be reliable and are correct to the best of their knowledge. However, the Publisher and its Authors shall in no event be liable for any errors, omissions or damages arising out of this information and specifically disclaim any implied warranties or merchantability or fitness for any particular use.

VIKAS®

Vikas® is the registered trademark of Vikas® Publishing House Pvt. Ltd.

VIKAS® PUBLISHING HOUSE PVT. LTD.
E-28, Sector-8, Noida - 201301 (UP)
Phone: 0120-4078900 • Fax: 0120-4078999
Regd. Office: A-27, 2nd Floor, Mohan Co-operative Industrial Estate, New Delhi 1100 44
• Website: www.vikaspublishing.com • Email: helpline@vikaspublishing.com

# मूलभूत राजकीय सिध्दांत



| | | |
|---|---|---|
| १ | राजकीय सिध्दांत : अर्थ, स्वरुप आणि व्याप्ती | ८१ |
| २ | स्वातंत्र्य, समता आणि बंधुता | ११५ |
| ३ | न्याय, हक्क आणि नागरिकत्व | १४५ |
| ४ | सत्ता, अधिसत्ता आणि अधिमान्यता | १८७ |
| ५ | राज्य लोकशाही आणि  नागरी समाज | २०९ |

# M.A. [Political Science]
## Second Year
## PS 211

# आधुनिक भारतातील राजकीय विचार आणि मूलभूत राजकीय सिद्धांत



ISBN 978-93-5453-650-2
9 789354 536502

Savitribai Phule Pune University
School of Open Learning
(Distance Education Program)

Savitribai Phule Pune University

School of Open Learning

(Distance Education Program)

**बी.ए. [ राजनीति विज्ञान ]**

**द्वितीय वर्ष**

**CC-H**



# राज्यशास्त्राची ओळख

# राज्यशास्त्राची ओळख

**B.A (Political Science)**
**Second Year**
**CC-H**

# SAVITRIBAI PHULE PUNE UNIVERSITY

## School of Open Learning
**(Distance Education Program)**

लेखक -

**प्रा. नामदेव पवार**
सहाय्यक प्राध्यापक,
कला, विज्ञान आणि वाणिज्य महाविद्यालय, इंदापूर
ता. इंदापूर, जि. पुणे.
Email - namdevpawar11@gmail.com
Mob. 9404170969

All rights reserved. No part of this publication which is material protected by this copyright notice may be reproduced or transmitted or utilized or stored in any form or by any means now known or hereinafter invented, electronic, digital or mechanical, including photocopying, scanning, recording or by any information storage or retrieval system, without prior written permission from the Publisher.

Information contained in this book has been published for School of Open Learning, Savitribai Phule Pune University, Pune by VIKAS Publishing House Pvt. Ltd. and has been obtained by its Authors from sources believed to be reliable and are correct to the best of their knowledge. However, the Publisher and its Authors shall in no event be liable for any errors, omissions or damages arising out of this information and specifically disclaim any implied warranties or merchantability or fitness for any particular use.

VIKAS®

Vikas® is the registered trademark of Vikas® Publishing House Pvt. Ltd.

VIKAS® PUBLISHING HOUSE PVT. LTD.
E-28, Sector-8, Noida - 201301 (UP)
Phone: 0120-4078900 • Fax: 0120-4078999
Regd. Office: A-27, 2nd Floor, Mohan Co-operative Industrial Estate, New Delhi 1100 44
• Website: www.vikaspublishing.com • Email: helpline@vikaspublishing.com

# राज्यशास्त्राची ओळख

## अनुक्रमणिका


| घटक क्र. | घटकाचे नाव | पृष्ठ क्र. |
| --- | --- | --- |
| **घटक १.** | **राज्यशास्त्राचे अध्ययन** | **१०** |
| १.० | उद्दिष्टे | १० |
| १.१ | प्रस्तावना | ११ |
| १.२ | विषय विवेचन | १२ |
| १.३ | सारांश | ३७ |
| १.४ | महत्त्वाचे शब्द | ३७ |
| १.५ | सरावासाठी प्रश्न | ३८ |
| १.६ | अधिक वाचनासाठी पुस्तके | ३८ |
| **घटक २.** | **राज्यशास्त्र अध्ययनाचे दृष्टिकोन** | **४२** |
| २.० | उद्दिष्टे | ४२ |
| २.१ | प्रस्तावना | ४३ |
| २.२ | विषय विवेचन | ४५ |
| २.३ | अनुभववादी/वास्तववादी दृष्टीकोन | ४८ |
| २.४ | स्त्रीवादी दृष्टिकोन | ५१ |
| २.५ | वर्तनवादी दृष्टिकोन | ५९ |
| २.६ | सारांश | ६४ |
| २.७ | महत्त्वाचे शब्द | ६५ |
| २.८ | सरावासाठी प्रश्न | ६५ |
| २.९ | अधिक वाचनासाठी पुस्तके | ६५ |
| **घटक ३.** | **मूलभूत संकल्पना** | **७०** |
| ३.० | उद्दिष्टे | ७० |
| ३.१ | प्रस्तावना | ७१ |
| ३.२ | विषय विवेचन | ७१ |
| ३.३ | बाजारपेठ | ८९ |
| ३.४ | नागरी समाज | ९४ |
| ३.५ | सारांश | ९७ |
| ३.६ | महत्त्वाचे शब्द | ९८ |

३.७ सरावासाठी प्रश्न ९८
३.८ अधिक वाचनासाठी पुस्तके ९८

**घटक ४. लोकशाही** **१०२**

४.० उद्दिष्टे १०२
४.१ प्रस्तावना १०३
४.२ विषय विवेचन १०३
४.३ सारांश १२३
४.४ महत्त्वाचे शब्द १२३
४.५ सरावासाठी प्रश्न १२३
४.६ अधिक वाचनासाठी पुस्तके १२४

**घटक ५. मूलभूत राजकीय मूल्य** **१२८**

५.० उद्दिष्टे १२८
५.१ प्रस्तावना १२९
५.२ विषय विवेचन १२९
५.३ समता : अर्थ व व्याख्या १३९
५.४ न्याय : अर्थ व व्याख्या १४५
५.५ सारांश १४९
५.६ महत्त्वाचे शब्द १५०
५.७ सरावासाठी प्रश्न १५०
५.८ अधिक वाचनासाठी पुस्तके १५०

**घटक ६. हक्क** **१५४**

६.० उद्दिष्टे १५४
६.१ प्रस्तावना १५४
६.२ विषय विवेचन १५६
६.३ सारांश १७१
६.४ महत्त्वाचे शब्द १७१
६.५ सरावासाठी प्रश्न १७१
६.६ वाचनासाठी अधिक पुस्तके १७२

**घटक ७. विचारप्रणाली** १७६

७.० उद्दिष्टे १७७
७.१ प्रस्तावना १७८
७.२ विषय विवेचन १७८
७.३ राष्ट्रवाद १८६
७.४ समाजवाद २०१
७.५ फॅसिझम २२३
७.६ सारांश २३४
७.७ महत्त्वाचे शब्द २३४
७.८ सरावासाठी प्रश्न २३४
७.९ अधिक वाचनासाठी पुस्तके २३६

**घटक ८. आंतरराष्ट्रीय संघटना** २४०

८.० उद्दिष्टे २४०
८.१ प्रस्तावना २४१
८.२ विषय विवेचन २४२
८.३ क्षेत्रीय संघटना २७०
८.४ बहुराष्ट्रीय निगम (मल्टीनॅशनल कॉर्पोरेशन्स) २७७
८.५ सारांश २८०
८.६ महत्त्वाचे शब्द २८०
८.७ सरावासाठी प्रश्न २८०
८.८ अधिक वाचनासाठी पुस्तके २८१

बी.ए. [ राजनीति विज्ञान ]

द्वितीय वर्ष

CC-H

# राज्यशास्त्राची ओळख



Savitribai Phule Pune University

School of Open Learning

(Distance Education Program)

ISBN 978-93-5453-932-9

# विचारशलाका

संपादक : प्रा. नागोराव कुंभार

वर्ष ३८ वे, एप्रिल २०२४ ते मार्च २०२५
जोड अंक १४८,१४९,१५० व १५१ वा

ISSN 2229-7901
UGC CARE Listed



# भारतीय लोकशाही

## आव्हाने व भविष्य

## विशेषांक

प्रा. डॉ. अशोक चौसाळकर

## गौरवांक

ISSN 2229-7901
UGC CARE Listed

# विचारशलाका

संस्थापक : प्रा. नागोराव कुंभार

वर्ष ३८ वे, एप्रिल २०२४ ते मार्च २०२५, जोड अंक १४८, १४९, १५० व १५१ वा

वार्षिक वर्गणी : रु. ६००/-, त्रैवार्षिक वर्गणी : रु. १८००/-,
सहावार्षिक वर्गणी : रु. ३६००/-, या अंकाचे मूल्य : रु. ६००/-

संपादक :

**नागोराव कुंभार**

**संपादक मंडळ :**

सूर्यनारायण रणसुभे
अशोक चौसाळकर
हरिदास फेरे
भारती पाटील
मुक्ता कुलकर्णी
राजशेखर सोलापुरे
विवेक घोटाळे
रणधीर शिंदे
प्रकाश कुंभार
विवेक सौताडेकर
ग्यानदेव उपाडे
कुंदा कांबळे

**संपादकीय व व्यवस्थापकीय पत्रव्यवहार :**

प्राचार्य डॉ. नागोराव कुंभार
'आई', शिवनगर, सूतमिल मार्ग,
लातूर - ४१३ ५१२, दूरध्वनी : (०२३८२) २४८१६७,
भ्रमणध्वनी : ९४२२९४९९६६,
E-mail - kumbharnl@gmail.com
Watsapp. No. - 8805982828

☐ या नियतकालिकातील लेखकांच्या विचारांशी संपादक, प्रकाशक, मालक, संपादक मंडळ व मुद्रक सहमत असतीलच, असे नाही. या अंकातील लेखकांची मते, वर्णने त्या त्या लेखकांची आहेत.

विचारशलाका
संस्थापक : प्रा. नागोराव कुंभार
ISSN 2229-7901
UGC CARE Listed
वर्ष ३८ वे, एप्रिल २०२४ ते मार्च २०२५, जोड अंक १४८, १४९, १५० व १५१ वा

## ॥ भारतीय लोकशाही : आव्हाने व भवितव्य विशेषांक ॥

## ॥ अंतरंग ॥

### ॥ भाग - एक ॥

संपादकीय...

१. भारतीय लोकशाही : आव्हाने आणि भवितव्य
***डॉ. जनार्दन वाघमारे*** / १

२. सर्वलोकशाही की अलोकशाही ?
***यशवंत मनोहर*** / २७

३. लोकशाही : एक लोकयात्रा
***प्रा.डॉ. सुभाषचंद्र भेलके*** / ४६

४. लोकशाहीची वाटचाल : जागतिक आव्हानांचा क्षण ?
***प्रा. सुहास पळशीकर*** / ६२

५. लोकशाहीच्या वळणवाटा
***प्रा. राजेश्वरी देशपांडे*** / ८९

६. भारतीय लोकशाहीपुढील आव्हाने व भवितव्य
***प्रा.डॉ. प्रकाश पवार*** / ९६

७. हुकूमशाहीचे आव्हान
***प्रा.डॉ. अशोक चौसाळकर*** / १०८

८. भारतीय अल्पसंख्याकांच्या विशेष हक्कांची पंचाहत्तरी
***प्रा. अलीम वकील*** / १२९

९. भारतीय लोकशाहीपुढील आव्हाने
***प्रा. डॉ. प्रदीप जगताप*** / १४४

१०. लोकशाही संकटात आहे का ? भारताचा अनुभव काय सांगतो ?
***प्रा. डॉ. विठ्ठल दहिफळे*** / १५३

११. भारतातील लोकशाही जिवंत आहे का ?
**डॉ. रविराज अंबादास वतने** / १७३
१२. लोकशाहीसमोरील बहुसंख्याकवादाचे आव्हान
**डॉ. विवेक घोटाळे** / १८५
१३. लोकशाही आणि कलात्मक स्वातंत्र्य
**लक्ष्मीकांत देशमुख** / १९७
१४. लोकशाही आणि शिक्षण
**डॉ. पंडित विद्यासागर** / २२७
१५. नोकरशाही व नागरिक यांचे लोकशाहीतील स्थान
**पन्नालाल सुराणा** / २३८
१६. कायद्याला नैतिकतेची जोड हवी
**पन्नालाल सुराणा** / २४५
१७. इंडिया पॅटर्नची उद्देशिका
**यशवंत मनोहर** / २४८
१८. भारतीय लोकशाही : पायाभरणी, पैलू व भवितव्य
**नामदेव अशोक पवार - प्रो.डॉ. दत्तात्रय वाबळे** / २६५

**।। भाग - दोन ।।**

१९. भारतीय लोकशाहीचे चर्चाविश्व : काही निरीक्षणे
**प्रा. यशवंत सुमंत** / २७५
२०. भारतीय लोकशाहीचे काही सिद्धांत
**प्रा.डॉ. अशोक चौसाळकर** / ३११
२१. महात्मा फुले यांची लोकशाहीची संकल्पना
**डॉ. अर्चना मलिक** / ३२४
२२. न्यायमूर्ती महादेव गोविंद रानडे : आधुनिकता आणि लोकशाही
**डॉ. प्राजक्ता दुबे** / ३४०
२३. नामदार गोपाळ कृष्ण गोखले यांचे लोकशाहीविषयक विचार
**शिवाजी मोटेगावकर** / ३४७

# १८

# भारतीय लोकशाही : पायाभरणी, पैलू व भवितव्य

■

**नामदेव अशोक पवार - प्रो.डॉ. दत्तात्रय वाबळे**

**आ**ज जगातील सर्वांत प्रिय शासन प्रकार म्हणजे लोकशाही होय. जगात बहुतांश देशांमध्ये लोकशाही शासन प्रकार आहे. विसावे शतक साम्यवादाप्रमाणेच लोकशाहीचे युग मानले जाते. या काळात अनेक देशांत लोकशाहीची निर्मिती झाली व बऱ्याच देशांत लोकशाही कोसळली सुद्धा. जगभरात अनेक शासन प्रकार अस्तित्वात असलेले पाहायला मिळतात. यात साम्यवादी, हुकूमशाही, फॅसिझम, नाझीझम इ. या सर्वांपेक्षा लोकशाही हा शासन प्रकार वेगळा व लोकप्रिय आहे. लोकशाही शासन प्रकार फार पूर्वीपासून चालत आलेला आहे. आधुनिक राजकीय विचारप्रणाली म्हणून लोकशाहीला मान्यता मिळाली आहे. प्रस्तुत संशोधनपर लेखात भारतीय लोकशाहीचे पैलू आणि भवितव्य याचा शोध घेण्याचा प्रयत्न केलेला आहे.

## लोकशाहीचा उदय व विकास

प्राचीन ग्रीक नगर राज्य व रोमन नगर राज्यात लोकशाहीचा उदय झालेला दिसतो. अथेन्सच्या नगर राज्यात प्रत्यक्ष लोकशाही होती. परंतु ती फार संकुचित होती त्या लोकशाहीमध्ये स्त्रियांना व गुलामांना शासन कारभारात भाग घेण्याचा अधिकार नव्हता. फक्त नागरिकच शासन कारभारात भाग घेत असत. रोमन नगर राज्यांमध्ये राजा लोकनियुक्त होता पण लोकमताला शासन कारभारात किंमत नव्हती. ग्रीकनंतर रोममध्ये लोकशाही फार काळ टिकू शकली नाही. ग्रीकानी रोमन लोकांना जिंकले. नंतर बाहेरच्या काही टोळ्यांनी रोमन साम्राज्य उद्ध्वस्त केली. इसवीसन पाच ते पंधरा या दहा शतकांच्या मध्ययुगीन कालखंडात इंग्लंडच्या जनतेने राज्याकडून सनद मिळवली (१२१५) तिला मॅग्ना-चार्टा म्हणतात. आधुनिक लोकशाहीचा तो पहिला टप्पा मानला

जातो. १५ जून १२१५ रोजी राजा जॉनने मॅग्ना चार्टावर सही केली व लोकांच्या हक्कांना एक प्रकारे मान्यता दिली. यामुळे राजाला पहिल्यांदाच कायद्याच्या चौकटीत आणले गेले आणि स्पष्ट केले गेले की, सर्व माणसे समान आहेत. १६८८ साली इंग्लंडमध्ये रक्तविहीन क्रांती झाली या क्रांती पाठीमागे जॉन लॉकचे तत्त्वज्ञान अधिष्ठित होते. या क्रांतीने राजेशाहीचा पाडाव होऊन संसदेची निर्मिती झाली. म्हणजे राजा ऐवजी जनतेची सत्ता महत्त्वाची मानली गेली. पुढे इंग्लंडची राज्यक्रांती, अमेरिकन राज्यक्रांती व नंतर फ्रेंच राज्यक्रांती या तीन क्रांतीनी लोकशाहीच्या विकासाला हातभार लावला. अमेरिकन राज्यक्रांती (१७७६) यात १३ अमेरिकन वसाहतींनी ब्रिटिश सत्ता झुगारून देऊन लोकशाही स्वरूपाचे संविधान स्वीकारले. पुढे फ्रेंच राज्यक्रांतीने (१७८९) तेथील अनियंत्रित राजेशाही, ऐतखाऊ सरंजामदार आणि बुरसटलेली धर्मसत्ता यांच्याविरुद्ध बंड पुकारले आणि फ्रान्सची राज्यक्रांती घडून आली. लोकशाहीचे मूलभूत राजकीय मूल्य स्वातंत्र्य-समता-बंधुता ही तत्त्वत्रयी या क्रांतीने जगाला दिली.

औद्योगिक क्रांतीमुळे लोकशाहीच्या विकासास पाश्चात्त्य देशात चालना मिळाली. लोकशाही विकासाचा दुसरा टप्पा सुरू झाला. कारखानदारी उत्पादनासाठी मागासलेल्या देशांमध्ये भांडवलदारांनी हातपाय पसरायला सुरुवात केली. त्यातून साम्राज्यवादाचा तिसरा टप्पा अस्तित्वात आला. पहिल्या टप्प्यावर तीन क्रांत्या झाल्या या टप्प्यावर जॉन लॉकने लोकशाहीची सैद्धांतिक भूमिका मांडली. दुसऱ्या टप्प्यावर औद्योगिक क्रांतीच्या टप्प्यावर बेंथम व मिल या उपयुक्ततावाद्याकडून लोकशाहीचा पुरस्कार केला गेला. तर तिसऱ्या टप्प्यावर ग्रीन, बोसांके हे तिचे प्रवक्ते झाले. पुढे बर्नार्ड शॉ, ग्रॅहम वालास, ॲनी बेझंट इत्यादीनी लोकशाहीचा विचार पुढे नेला.

## भारतीय लोकशाहीची पायाभरणी

वासाहतिक कालखंडापासून भारतीयांना लोकशाही मूल्ये व राज्यपद्धतीचा परिचय होत गेला. इंग्रजी राजवटीच्या विरोधात दीडशे वर्षे स्वातंत्र्यासाठी संघर्ष करत १९४७ साली भारत स्वतंत्र झाला. या संबंध कालखंडात भारतीयांच्या लोकशाही विषयीच्या धारणा प्रगल्भ होत गेल्या, परिणामतः स्वातंत्र्यानंतर भारतीयांनी लोकशाही राज्यपद्धतीचा स्वीकार केला. घटनाकारांनी अथक परिश्रमातून भारतीय प्रजासत्ताकाचे संविधान साकारले आणि स्वतंत्र भारतात संसदीय लोकशाही पद्धतीचा राज्यकारभार सुरू झाला. जेव्हा भारताने नव्या लोकशाही प्रकल्पाची सुरुवात प्रौढ मताधिकारावर आधारित निवडणुकांपासून केली, तेव्हा भारतावर नजर ठेवून असणाऱ्या अनेक अभ्यासकांनी लोकशाहीच्या



वाटचालीबद्दल शंका उपस्थित केली. सुशिक्षित वर्ग व शहरी बुद्धिवंतांनी या प्रकल्पाकडे तिरस्कारानेच पाहिले आणि अशिक्षितांना मताधिकार दिल्याची परिणिती अपयशात होणार असे म्हटले. या सर्व शंकाकुशंका खोट्या ठरवत आज भारत 'लोकशाही शासन आणि खुल्या निवडणुका येथे होतात.' असे सांगू शकणाऱ्या काही मोजक्या देशांपैकी एक आहे.

जगातल्या अनेक देशातील लोकशाहीची पडझड होत असताना किंवा अनेक ठिकाणची लोकशाही कोसळत असताना, भारतातील लोकशाही संस्था गेली सात दशके कशी टिकून आहे. यावर भारतीय अभ्यासक आणि तौलनिक राज्यशास्त्राच्या विद्यार्थ्यांत बरीच चर्चा झालेली आहे. सामाजिक असमानता, आर्थिक विषमता, गरिबी, निरक्षरता, फुटीरतावादी प्रवृत्ती, जमातवादी दंगली इत्यादी घटकांनी भारतीय लोकशाहीच्या पायाला खिळखिळे केलेले नाही. उलट भारताकडे आज जगातील सर्वांत मोठा लोकशाही देश म्हणून पाहिले जाते.

## भारताचे संविधान व लोकशाही

आज भारत देश हा लोकशाही शासनव्यवस्था राबविण्याच्या दृष्टीने जगातील सर्वांत मोठा व यशस्वी असा देश आहे. भारताच्या लोकशाही यशस्वीतेचे गमक भारताच्या संविधानामध्ये असलेले दिसते. घटनाकारांच्या अथक परिश्रमातून भारतीय प्रजासत्ताकाचे संविधान साकारले. या संविधानाने लोकशाहीला प्रबळ करण्याचे काम केले आहे. लोकशाही ही एक आधुनिक संकल्पना असून वसाहतकालीन भारतात आधुनिकीकरणाची प्रक्रिया जसजशी सुरू झाली, तसतसा भारतीयांना स्वातंत्र्य, समता, हक्क या लोकशाहीला प्रमाणभूत असणाऱ्या संकल्पनांचा परिचय होत गेला तसेच कायद्याचे राज्य, प्रातिनिधिक शासन, जबाबदार शासनपद्धती या तत्त्वांची ओळख होत गेली.

भारतीय संविधानाच्या उद्देशपत्रिकेने या देशांमध्ये सार्वभौम, समाजवादी, धर्मनिरपेक्ष, लोकशाही गणराज्य निर्मितीचा संकल्प सोडलेला आहे. या लोकशाही गणराज्यात प्रत्येक नागरिकाला सामाजिक, आर्थिक व राजकीय न्याय, विचार, अभिव्यक्ती, विश्वास, श्रद्धा व उपासना यांचे स्वातंत्र्य असेल. त्याचप्रमाणे दर्जा व संधीची समानता ही मिळेल अशी हमी ही उद्देशपत्रिका देते. सर्वांना व्यक्तिप्रतिष्ठा लाभेल, सर्वांच्या बंधुभावावर आधारित राष्ट्रीय एकता व एकात्मता बळकट होईल. अशी अपेक्षा हृदयात बाळगून हे संविधान सर्व भारतीयांनी स्वतःप्रत अर्पण केले असल्याचे ही उद्देशपत्रिका घोषित करते. या उद्देशपत्रिकेतून भारतीय राज्यव्यवस्थेचे लोकशाही स्वरूप स्पष्ट होते.

## लोकशाहीचे पैलु : सामाजिक, आर्थिक आणि राजकीय

आपल्या देशात आधुनिक राजकीय लोकशाही संस्थांची निर्मिती करत असताना संविधानकारांना याची पूर्ण कल्पना होती की, आपले सामाजिक-आर्थिक जीवन विषमतेने पूर्णपणे भरलेले आहे. येथील परंपरेत लोकशाहीच्या कोणत्याच तत्त्वाचा मागमूसही नाही. येथे दारिद्र्य, निरक्षरता, मागासलेपणा, बेरोजगारी अशा सगळ्याच अरिष्टांचे प्रमाण प्रचंड मोठे आहे. अस्पृश्यतेसारख्या अमानुष प्रथा आणि स्त्रीदास्याचे भीषण प्रकार येथील जनजीवनात पक्के बसले आहेत. पण त्यांची अशी अपेक्षा होती की या सामाजिक व आर्थिक मर्यादा राजकीय लोकशाहीद्वारे हळूहळू दूर होऊ शकतील. राजकीय लोकशाहीला आधारभूत ठरू शकणाऱ्या आर्थिक व सामाजिक लोकशाहीची येथे प्रयत्नपूर्वक व जाणीवपूर्वक उभारणी केली जाईल. विविध राजकीय शक्तींच्या सहकार्यातून एक सहमती साकार होऊ शकेल. धोरणात्मक सातत्याद्वारे समाजाचे समतलन घडून येईल. संघर्ष निवारणाचे शांततापूर्ण मार्ग विकसित होतील. जबाबदार व प्रतिसाददायी प्रशासनातून संविधानाची नव समाजरचनेची स्वप्ने साकार होतील आणि संविधानाचे उद्घाटन करताना देशात जो अनुरूप सामाजिक-आर्थिक पर्यावरणाचा अभाव आहे तो कालांतराने दूर होईल.

### लोकशाहीचा सामाजिक पैलू

लोकशाहीच्या सामाजिक पैलूमध्ये समाजात न्याय व स्वातंत्र्य प्रस्थापित करण्यासाठी समाजातील आर्थिक संघटनावर समाजाचे नियंत्रण प्रस्थापित करण्याचा आग्रह असलेला दिसतो. पण हे नियंत्रण लोकशाही मार्गाने मिळवले पाहिजे हा अट्टहास असलेला दिसतो. उत्पादन साधनांची सामुदायिक मालकी करून उत्पादनांचे वितरण सर्वांच्या समान हिताला केंद्रीभूत ठेवून झाले पाहिजे, तरच खऱ्या अर्थाने समाजात समता व न्याय प्रस्थापित होईल ही लोकशाहीच्या सामाजिक पैलूची धारणा होती. म्हणजेच सामाजिक लोकशाहीमध्ये व्यक्ती व सामूहिक हित यात समन्वय साधण्याचा प्रयत्न केलेला दिसतो.

भारताच्या संदर्भात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी सामाजिक लोकशाहीचा आग्रहाने पुरस्कार केलेला दिसतो. शासन संस्थेपुरती लोकशाही मर्यादित न करता सर्वच सामाजिक संस्थांचे लोकशाहीकरण करावे या विचारास सामाजिक लोकशाही असे म्हणतात. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी या अर्थाने सामाजिक लोकशाही ही संज्ञा वापरली होती. त्यांच्या मते समाजातील जातीयता, गरिबी व निरक्षरता नष्ट झाल्याशिवाय लोकशाही अस्तित्वात येऊ शकत नाही. समाजातील जातिभेद नष्ट होऊन स्वातंत्र्य, समानता व न्याय सर्वांकरिता प्रस्थापित झाला पाहिजे ही आंबेडकरांची भूमिका होती.



## सामाजिक लोकशाहीची मूलभूत तत्त्वे

### (१) स्वातंत्र्य-समता-बंधुता

फ्रेंच राज्यक्रांतीने दिलेली स्वातंत्र्य, समता व बंधुता ही तत्त्वत्रयी आज जगभरच्या लोकशाहीची मूलतत्त्वे म्हणून ओळखली जात आहेत. एवढेच नव्हे तर कोणत्याही समाजाचे व राज्यसंस्थेचे मूल्यमापन करण्यासाठी स्वातंत्र्य, समता, बंधुता ही तत्त्वे प्रमाण मानली जातात. जी लोकशाही ही तत्त्वे प्रभावीपणे अमलात आणते ती लोकशाही यशस्वी लोकशाही समजली जाते. प्रत्येक व्यक्तीला आपल्या व्यक्तिमत्वाचा विकास करण्याचे स्वातंत्र्य असले पाहिजे, प्रत्येकाला संधीची समानता असली पाहिजे व हे सर्व करायचे असेल तर राष्ट्रामध्ये बंधुताही नांदली पाहिजे तरच ती शासनपद्धती व राष्ट्र स्वतःचा विकास करू शकते. स्वातंत्र्य समता व बंधुता यावर आधारित समाजनिर्मिती हे सामाजिक लोकशाहीचे एक मूलभूत तत्त्व आहे.

### (२) मूलभूत हक्क

लोकशाही देशामध्ये मूलभूत हक्कांचा समावेश संविधानात केलेला दिसतो. भारताच्या संविधानामध्ये तिसऱ्या भागात कलम १२ ते कलम ३५ या संबंध कलमांमध्ये मूलभूत हक्काची तरतूद करण्यात आलेली आहे. त्याचबरोबर या मूलभूत हक्कांना घटनेने न्यायालयीन संरक्षण सुद्धा पुरवले आहे. त्यामुळे कोणत्याही व्यक्तीच्या मूलभूत हक्कावर इतर व्यक्तीला किंवा राज्यसंस्थेला बंधने आणता येत नाहीत. तसे बंधने आणण्याचा कोणी प्रयत्न केला तर त्याविरोधात व्यक्तीला उच्च व सर्वोच्च न्यायालयात दाद मागता येते.

### (३) लोकशाही व समाजवाद यांचा मेळ

सामाजिक लोकशाहीमध्ये लोकशाही व समाजवाद यांचा मेळ घालून व्यक्ती व सामूहिक हित यात समन्वय घडवून आणण्याचा उद्देश दिसतो. लोकशाहीतील स्वातंत्र्य व समाजवादातील समता या दोन विचारांना मुरड घालून नवीन समाज रचना निर्माण करण्याचा प्रयत्न सामाजिक लोकशाहीमध्ये अभिप्रेत आहे.

### (४) कल्याणकारी राज्य

लोकशाही शासन पद्धतीमध्ये राज्याने शांतता, सुव्यवस्था व संरक्षण याबरोबरच सामाजिक परिवर्तन आणि आर्थिक विकास साध्य करणारे उपयुक्त साधन म्हणून कार्य केले पाहिजे. तसेच राज्याने लोककल्याणकारी व समाज सेवा उपलब्ध करणारी संघटना म्हणून कार्य केले पाहिजे. म्हणजेच कल्याणकारी राज्याच्या स्वीकारातून समाजात न्याय व समता प्रस्थापित करण्याचा प्रयत्न केला जातो.

थोडक्यात लोकशाहीच्या सामाजिक पैलूमध्ये भांडवलशाहीतील शोषण व आर्थिक विषमता नष्ट करणे अपेक्षित आहे. तर भारताच्या संदर्भात येथील जातीयता, गरिबी, निरक्षरता, स्त्री-पुरुष विषमता आदि सर्व विषमता नष्ट करून स्वातंत्र्य, समता व न्यायावर आधारित समाज निर्माण झाला पाहिजे हे सामाजिक लोकशाहीमध्ये अपेक्षित आहे. स्वातंत्र्य व समतेवर आधारित लोकशाहीच खऱ्या अर्थाची लोकशाही ठरू शकेल हा आशावाद या सामाजिक पैलूमध्ये व्यक्त होताना दिसतो.

### लोकशाहीचा आर्थिक पैलू

आर्थिक लोकशाही हा लोकशाहीचा महत्त्वाचा पैलू आहे. आर्थिक लोकशाही सामाजिक आणि आर्थिक तफावत कमीत कमी करण्याचा प्रयत्न करते. समावेशक लोकशाहीच्या दृष्टिकोनानुसार आर्थिक सत्तेच्या वाटपात समता आणून आर्थिक समता निर्माण करणे म्हणजे आर्थिक लोकशाही होय. आर्थिक लोकशाही साध्य करण्यासाठी विषम आर्थिक सत्तेचा अभाव, आर्थिक निर्णय प्रक्रियेत लोकांचा सहभाग, बाजार नियंत्रणासाठी सामाजिक नियंत्रण, सार्वजनिक खर्च, समाजवादी आणि मिश्र अर्थव्यवस्था, कमीत-कमी आर्थिक विषमता या अटींची पूर्तता आवश्यक असते.

### (१) उद्देशपत्रिका व आर्थिक लोकशाही

भारतीय राज्यघटनेच्या उद्देशपत्रिकेत आर्थिक लोकशाहीचा समावेश आढळतो. उद्देशिकेत स्पष्ट करण्यात आले आहे की, भारत समाजवादी देश असावा, ज्यात सामाजिक आणि राजकीय न्यायाबरोबरच आर्थिक न्याय महत्त्वाचा असून तो साध्य करण्याचा प्रयत्न करावा. त्यासाठी दर्जा व संधीची समानता निर्माण करावी.

### (२) मूलभूत हक्क व आर्थिक लोकशाही

भारतीय संविधानाच्या कलम १२ ते ३५ कलमांमध्ये मूलभूत हक्क स्पष्ट केलेले आहेत. त्यातही आर्थिक लोकशाही विषयी तरतुदी आहेत. जसे की समतेच्या हक्कात धर्म, वंश, जात, जन्म, लिंग इत्यादी आधारे भेद करता येणार नाही. सार्वजनिक क्षेत्रात रोजगार संधीत समता प्रस्थापित करावी असे स्पष्ट करण्यात आलेले आहे. त्याचबरोबर स्वातंत्र्याच्या हक्कात कामगार संघटना निर्माण करण्याबरोबरच कोणीही, कोणताही व कोठेही व्यवसाय व व्यापार करू शकतो हे स्वातंत्र्य दिले आहे. तसेच पिळवणूक विरोध हक्कांमध्ये मानव तस्करी, सक्तीचे श्रम आणि बालमजुरी परवानगी नाकारलेली आहे. अल्पसंख्याकांना शिक्षणसंस्था सुरू करता येतील, प्राथमिक शिक्षण सक्तीचे व मोफत असेल अशी तरतूद आहे. थोडक्यात मूलभूत हक्काच्या माध्यमातून आर्थिक विषमता कमी करून आर्थिक लोकशाही निर्मितीचा प्रयत्न केलेला दिसतो.



### (३) मार्गदर्शक तत्त्वे व आर्थिक लोकशाही

राज्याच्या धोरणाची मार्गदर्शक तत्त्वे आपणास आर्थिक लोकशाही संदर्भात मार्गदर्शन करतात. राज्यांनी सामाजिक कल्याण योजना तयार करून त्यांची अंमलबजावणी करावी. सर्व नागरिक स्त्रिया आणि पुरुषांना उत्पादन साधनांची मालकी, नियंत्रण आणि वाटप संपत्तीचे केंद्रीकरण होणार नाही असे करावे. तसेच स्त्री-पुरुषांना समान कामासाठी समान वेतन देण्यात दयावे, कामगारांना जगण्यासाठी आवश्यक वेतन, व्यवस्थापनात सहभाग, त्यांचे पोषण, राहणीमान व आरोग्य सुधारणे हे राज्याचे कर्तव्य आहे. हे मार्गदर्शक तत्त्वांमध्ये स्पष्ट करण्यात आलेले आहे.

भारतीय घटनेत आर्थिक लोकशाहीची कल्पना आंबेडकरांनी मांडली आहे. ज्यांना प्राथमिक अशा जीवनाश्यक गोष्टी मिळत नसतात अशांचे समाधान करण्यावर; तसेच त्यांना माणुसकीच्या दर्जापर्यंत आणण्यावरच भारतीय लोकशाहीचे यश अवलंबून आहे. जनतेला स्वातंत्र्य, मालमत्ता किंवा सुख यांचा हक्क मिळवून देण्यात संसदीय लोकशाहीला यश आले किंवा नाही हा चर्चेचा विषय आहे. सामाजिक आणि आर्थिक लोकशाहीशिवाय राजकीय लोकशाही टिकू शकणार नाही. कारण त्या आडव्याउभ्या धाग्यांनीच लोकशाहीचे वस्त्र विणले जात असते, असा अभिप्राय आंबेडकरांनी व्यक्त केला होता.

भारतीय संविधानाच्या उद्देशपत्रिकेत, मूलभूत हक्कांमध्ये व मार्गदर्शक तत्त्वांमध्ये आर्थिक समतेसंदर्भात तरतुदी असल्या तरी आज भारतात आर्थिक विषमता वेगाने वाढत आहे. ऑक्सफॅमच्या अहवालाप्रमाणे देशात एक टक्का कुटुंबाकडे ७३ टक्के उत्पन्नाचा हिस्सा आहे. म्हणजेच भारतामध्ये आर्थिक विषमतेचे स्वरूप कसे आहे ते या उदाहरणावरून स्पष्ट होते. भारतामध्ये आर्थिक विषमता संपवून आर्थिक समता आणायची असेल, तर देशाचे विकास धोरण गरिबी, बेकारी आणि विषमता निर्मूलनास अनुकूल हवे.

### लोकशाहीचा राजकीय पैलू

राजकीय लोकशाहीमध्ये लोकांना आपले नेतृत्व निवडण्याचा अधिकार असतो. तसेच निवडून दिलेल्या नेत्याला त्यांनी मांडलेल्या धोरणाप्रती व त्यांच्या कार्याप्रती त्यांना जबाबदार ठरवता येते. संसदेत आपले प्रतिनिधी कोण असावेत, तसेच राज्य व स्थानिक पातळीवर सरकारचे नेतृत्व कोणी करावे हे लोक निवडणुकीच्या माध्यमातून निश्चित करत असतात. कालबद्ध, निर्भय आणि निपक्षपाती निवडणुकांमधून वेगवेगळ्या राजकीय पक्षांच्या स्पर्धेतून नेतृत्वाची निवड केली जाते. कोणतेही सरकार हे लोक

संमतीवर आधारित असते, कारण लोकशाहीत लोक सार्वभौम असतात. त्यांच्याकडे सर्वोच्च राजकीय अधिकार असतात. सरकारमधील नेतृत्वाला लोकांकडून सत्ता मिळते. नेतृत्वाकडे सत्ता ही तात्पुरत्या कालावधीसाठी असते म्हणजेच निवडून दिलेल्या कालावधीतपुरती असते.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या मते राजकीय लोकशाहीची उभारणी चार गृहीतावर झालेली असते.

(१) व्यक्ती हेच एकमेव साध्य आहे.

(२) व्यक्तीला काही अदेय हक्क व त्यांची संविधानाने हमी दिलीच पाहिजे.

(३) कोणत्याही विशेष अधिकाराच्या प्राप्तीखातर व्यक्तीला आपल्या सांविधानिक हक्काचा त्याग करावा लागू नये.

(४) शासन करण्याची सत्ता राज्यसंस्थेकडून कोणत्याही खाजगी व्यक्तींना दिली जाता कामा नये.

डॉ. बाबासाहेबांच्या मते अस्पृश्य, शोषित, दलित, पीडित इत्यादींच्या प्रश्नांना वाचा फोडण्यासाठी केवळ लोकशाही शासनपद्धतीच उपयुक्त आहे. बाबासाहेबांची लोकशाही ही केवळ शासन प्रकार नसून ती एक जीवनपद्धती आहे. त्यात व्यक्तिस्वातंत्र्य, समता, समाजवाद, धर्मनिरपेक्ष राष्ट्र इ. घटक किंवा मूल्यांना महत्त्व आहे.

सामाजिक लोकशाहीचा पाया खंबीर केला तरच राजकीय लोकशाही टिकेल. स्वातंत्र्य, समता व बंधुता या तीन जीवनतत्त्वातील एक तत्त्व गळाले तरी सर्व लोकशाहीचा हेतूच विफल झाल्यासारखे होते. राजकारणातील विशिष्ट लोकांचा दरारा व मक्तेदारी तसेच सामाजिक विषमता हे दृश्य पालटले पाहिजे. असे झाले नाही तर विषमतेची झळ लागलेला वर्ग राजकीय लोकशाहीचे कवच फोडून टाकल्याशिवाय स्वस्थ बसणार नाही, असा इशारा डॉ. आंबेडकरांनी घटना समितीत दिला होता.

लोकशाहीचे रूप सतत बदलत असते. तिची वाढ आपोआप होत नसते. लोकशाहीची वाढ योग्य दिशेने व योग्य पद्धतीने होण्यासाठी तिची मशागत करावी लागते. लोकशाही यशस्वी होणे आवश्यक असेल तर तिचा पाया चांगल्या सामाजिक संबंधावर अधारलेला पाहिजे. दारिद्र्य, निरक्षरता व जातिभेद लोकशाहीला धोकादायक असल्याचे आंबेडकरांनी सांगितले आहे. मानवी हक्क वापराबाबत समाजात भेदभाव असता कामा नये. तसे असल्यास सामाजिक व राजकीय लोकशाही नाकारल्यासारखे होईल. सामाजिक पाया मजबूत न करता राजकीय लोकशाही बळकट करण्याचे प्रयत्न



अपयशी ठरतील असा इशारा डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी दिला होता. तो किती प्रस्तुत होता हे आज आपल्या लक्षात येते.

## लोकशाहीचे भवितव्य

पूर्वीच्या काळापासून लोकशाही विकसित होत आलेली असली व ती यशस्वी झाली असली तरी सद्यस्थितीत लोकशाहीवरचा विश्वास डळमळू लागलेला आहे. लोकशाहीच्या भवितव्याबाबत शंका निर्माण झाली आहे. त्यामुळे लोकशाहीच्या मूलतत्त्वात परिस्थिती अनुरूप बदल केले तर भविष्यकाळात लोकशाही यशस्वी होऊ शकते.

## लोकशाहीचा भविष्यकाळ उज्ज्वल व्हावा यासाठी सुधारणा

(१) जनतेमध्ये शिक्षणाचा प्रसार केला जावा त्यामुळे लोकांची शैक्षणिक पातळी उंचावून ते जबाबदार नागरिक यादृष्टीने आपले कर्तव्य पार पाडतील.

(२) सामाजिक समता, आर्थिक स्वातंत्र्य, सुरक्षितता, सामाजिक न्याय ही तत्त्वे मान्य झाली असली तरी त्यांची अंमलबजावणी योग्य रितीने झाली नाही किंवा आवश्यक त्या प्रमाणात झाली नाही यासाठी पद्धतशीर प्रयत्न होणे गरजेचे आहे.

(३) मतदाराने जागरूक राहून प्रतिनिधींची निवड केली पाहिजे.

(४) विभूतिपूजेला विरोध केला पाहिजे कारण राजकारणात विभूतिपूजा शेवटी हुकूमशाही प्रस्थापित करते.

(५) लोकशाही राज्याने लोककल्याणाच्या झेपतील एवढ्या जबाबदाऱ्या स्वीकारून त्या योग्य रितीने पार पडाव्यात.

या सुधारणा केल्यानंतर नक्कीच लोकशाहीला उज्ज्वल भवितव्य आहे.

## समारोप

आज अनेक दोष असून देखील जगातील अनेक राष्ट्रे लोकशाही का स्वीकारत आहेत? लोकशाही शासन प्रकाराचे एवढे आकर्षण का? लोकशाही हा सर्वांत प्रिय शासन प्रकार का? या सर्व प्रश्नांचे उत्तर म्हणजे लोकशाहीतील दोष मान्य करूनही लोकशाहीला दुसरा समर्थ पर्याय नाही. लोकशाहीत मर्यादित शासन असते, लोकांना शांततामय मार्गाने बदल करण्याची शक्यता असते. अशी शक्यता हुकूमशाही किंवा सर्वंकष व्यवस्थेत जवळ जवळ नसते. जुलूम अन्यायाविरुद्ध आवाज उठवणे केवळ लोकशाहीतच शक्य आहे त्यामुळे लोकशाही सर्व दोष किंवा मर्यादासह सर्वोत्तम पर्याय ठरतो.

संदर्भसूची :

१. भोळे भा.ल., २०११ (आठवी आवृत्ती), राजकीय सिद्धांत, नागपूर, पिंपळापुरे प्रकाशन.

२. पाटील बी.बी., २०००, राजकीय संकल्पना, कोल्हापूर, फडके प्रकाशन.

३. यादव योगेन्द्र, सुहास पळशीकर, पीटर डिसूझा, (अनुवाद मनोहर सोनवणे), लोक
जिंदाबाद, पुणे, समकालीन प्रकाशन.

४. व्होरा राजेंद्र, सुहास पळशीकर (संपा), चित्रा लेले (अनु.), २०१०, भारतीय लोक
अर्थ आणि व्यवहार, पुणे, डायमंड प्रकाशन.

५. चौसाळकर अशोक, २०१७, आधुनिक राजकीय सिद्धांत, पुणे, युनिक अँकॅडमी.

६. गोखले रामचंद्र, १९७२, आधुनिक राज्यशास्त्र, पुणे, कॉन्टिनेन्टल प्रकाशन.

७. पळशीकर सुहास, २०१३ (द्वि.आ.), राजकारणाचा ताळेबंद भारतीय लोकशाहीची वाट
पुणे, साधना प्रकाशन.

८. भोळे भा.ल., २०१२, भारतीय गणराज्याचे शासन आणि राजकारण, नागपूर, पिंपळापुरे
बुक डिस्ट्रीब्युटर्स.

९. भार्गव राजीव आणि अशोक आचार्य (संपा) हेमंत बनसोडे (अनु), २०११, राजकीय
सिद्धांत, नवी दिल्ली, पियरसन प्रकाशन.

१०. *David Held, 2006, Models of Democracy third edition, Stanford University Press.*

**नामदेव अशोक पवार**
संशोधक विद्यार्थी
राज्यशास्त्र विभाग
हिंद सेवा मंडळाचे पेमराज
सारडा महाविद्यालय, अहमदनगर

**प्रो. डॉ दत्तात्रय वाबळे**
साहेबराव शंकरराव ढमढेरे
कला व वाणिज्य महाविद्यालय
तळेगाव, पुणे

□□□